RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१८ शनिवार एप्रिल २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक ३२२
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## सर्व शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य:

■ महाराष्ट्रातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व मंडळांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकवणे आता केवळ सक्तीचेच नाही, तर अनिवार्य करण्यात आले आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला जाणार असून, थेट शाळेची मान्यता रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शुक्रवारी (दि. १७ एप्रिल) या महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली. राज्याच्या भाषा धोरणानुसार मराठी भाषेचे अध्यापन सर्व शाळांना बंधनकारक आहे. मात्र, काही आंतरराष्ट्रीय आणि खासगी शाळांमध्ये मराठी विषय शिकविला जात नसल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्याची गंभीर दखल घेत शासनाने आज एक नवीन आदेश जारी केला आहे.

# सरकार अपयशी : विधेयक नामंजूर

## महिला आरक्षणावर मोदी सरकार हरले :१२ वर्षांमध्ये पहिल्यांदाच मोठी नाचक्की

**▸विदर्भ केसरी।दिल्ली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारची शुक्रवारी मोठी फजिती झाली. गेल्या १२ वर्षांत पहिल्यांदाच सरकार स्वतः आणलेले विधेयक, लोकसभेत मंजूर करून घेऊ शकले नाही. महिला आरक्षणाच्या नावाखाली घाईघाईने आणलेल्या 'नारी वंदन सुधारणा विधेयका'साठी आवश्यक असलेले संख्याबळ जमवण्यात सरकार अपयशी ठरले. लोकसभेत मतदानावेळी आवश्यक असलेल्या ३५२ मतांच्या तुलनेत सरकारला केवळ २९८ मते मिळवता आली, तर विरोधकांच्या पारड्यात २३० मते पडली. मोदी सरकारचे लोकसभेतील 'फ्लोर मॅनेजमेंट' पूर्णपणे कोलमडण्याची ही पहिलीच वेळ आहे. विरोधी 'इंडिया' आघाडीने अभूतपूर्व एकता दाखवत सरकारला नमवले, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये निवडणुका सुरू असतानाच सरकारचा हा डाव त्यांच्यावरच उलटला आहे.

### बिल न समजताच विरोध : शाह

■ पण मतदानापूर्वी उत्तर देताना गृहमंत्री अमित शाह म्हणाले, विरोधकांनी मोदी जे काही करत आहेत त्याला विरोध करायचा असेच ठरवले आहे. माता-भगिनींसाठी आरक्षण येत असताना विरोध होणार नाही असे वाटले होते, तो होत आहे. २०२३ मध्ये हे विधेयक सर्वसंमतीने मंजूर झाले होते, पण आता काँग्रेस माघार घेत आहे. याचे कारण म्हणजे हे बिल मोदी आणत आहेत आणि त्याचे श्रेय त्यांना मिळेल ही भीती आहे. त्यांनी पुढे म्हटले की, निवडणुकीत जिथे जाल तिथे तुम्हाला महिलांच्या आक्रोशाला सामोरे जावे लागेल.

### पराभवानंतर सरकारने २ विधेयके मागे घेतली

■ महिला आरक्षण सुधारणा विधेयकावरील पराभवानंतर सरकारने 'मतदारसंघ फेररचना (सुधारणा) विधेयक २०२६' आणि 'केंद्रशासित प्रदेश कायदा (सुधारणा) विधेयक २०२६' वर मतदान घेतले नाही. मतदारसंघच्या फेररचनेसाठी लोकसंख्या' या व्याख्येमध्ये बदल प्रस्तावित होता, ज्यानुसार २०११ च्या जनगणनेच्या आधारे लोकसभेच्या जागा ८५० (राज्यांतून ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांतून ३५) करण्याचे प्रस्तावित होते.




### मोदी-शाह यांना धक्का

■ लोकसभेत एवढ्या महत्त्वाच्या मुद्द्यावर झालेल्या पराभवामुळे मोदी-शाह यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भाजपमधील एका गटाला असे वाटते की, यामुळे पक्षाच्या प्रतिष्ठेलाही धक्का पोहोचला आहे.

### राहुलच्या भाषणात गोंधळ

■ संसदेच्या विशेष अधिवेशनात शुक्रवारी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महिला आरक्षण आणि मतदारसंघ फेररचनेवर आपली भूमिका मांडली. यावेळी संसदेत प्रचंड गदारोळ झाला. राहुल यांनी दावा केला की, पुढच्या ४५ मिनिटांत आम्ही सरकारला हरवू. त्यांनी आरोप केला की, या विधेयकाचा महिला आरक्षणाशी संबंध नसून हा भारताचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे. सरकार जातगणना दाबण्याचा प्रयत्न करत आहे. हे महिला सक्षमीकरणाचे बिल नाही. जुने बिल आणा, आम्ही पाठिबा देऊ. तुमची सत्ता कमी होत असल्याने तुम्ही आसामप्रमाणे देशाचा निवडणूक नकाशा बदलू इच्छित आहात, पण आम्ही ओबीसींचा हक्क हिरावून घेऊ देणार नाही, असेही राहुल म्हणाले.

### भाजप महिला खासदार करणार निदर्शने

■ महिला आरक्षण विधेयक लोकसभेत फेटाळले गेल्यामुळे भाजप आणि एनडीएच्या महिला खासदारांनी विरोधकांविरुद्ध आंदोलन केले. संसदेच्या मकर द्वारापासून हे आंदोलन सुरू झाले. आता भाजप आणि एनडीएचे कार्यकर्ते आज, १८ एप्रिलपासून 'इंडिया' आघाडीतील नेत्यांच्या घराबाहेर निदर्शने करणार आहेत.



## ४९ दिवसांनंतर होर्मुझ जलमार्ग झाला खुला

**▸विदर्भ केसरी।**

इराणने होर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे खुली केल्याची घोषणा केली आहे. इराणने म्हटले की, इस्रायल लेबनॉन युद्धविरामानंतर ४९ दिवसांनी होर्मुझ सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करण्यात आली आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर हल्ला केला होता, त्यानंतर होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक विस्कळीत झाली होती. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराधची यांनी सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनी केवळ युद्धविरामाच्या उर्वरित कालावधीसाठीच खुली करण्यात आली होती. यानंतर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही सांगितले की, इराणने होर्मुझ सामुद्रधुनी सर्व प्रकारच्या जलवाहतुकीसाठी पूर्णपणे खुली केली आहे. ट्रम्प हे होर्मुझबाबत करार झाल्याचा वारंवार दावा करत होते आणि नाकेबंदीची धमकी देत होते. आता इराणने ही सामुद्रधुनी खुली केल्यामुळे तणाव लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे.

### जवळपास ८०० जहाजे अडकली होती

होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे १८७ हून अधिक तिलवाहू जहाजांसह सुमारे ८०० जहाजे अडकून पडली. इराणने या मार्गावर समुद्री सुरुंग अंधरल्याचा दावा केला होता. मार्ग खुला झाला असला तरी, या सुरुंगांमुळे जहाजांना मोठा अपघात होण्याचा धोका कायम आहे. अराघची यांच्या मते, अपघात टाळण्यासाठी जहाजांनी एका निश्चित मार्गाचे पालन करणे आवश्यक आहे. हा मार्ग इराण पोर्ट्स अँड मेरिटाइम ऑर्गनायझेशनने आधीच जाहीर केला होता.

## खरातचा 'खास' मारला गेला!

### समृद्धीवर दुर्घटना; कंटेनरला धडकली कार, पत्नीही ठार

**▸विदर्भ केसरी। नाशिक/छ. संभाजीनगर,**





. नाशिक सेक्स स्कैंडल प्रकरणातील भोंदू तांत्रिक अशोक खरात याचा अत्यंत जवळचा मानला जाणारा आणि 'शिवनिका ट्रस्ट'चा उपाध्यक्ष जितेंद्र शेळके याचा शुक्रवारी समृद्धी महामार्गावर भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाला. या घटनेमुळे खरात प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे.

पोलिसांनुसार, शेळके आपल्या कुटुंबासह छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात होते. धोत्रे गावाजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका कंटेनरला त्यांच्या कारने पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की कार थेट कंटेनरच्या खाली घुसली आणि शेळके यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात त्यांच्या पत्नी आणि मुलगा गंभीर जखमी झाले. यानंतर त्यांच्या पत्नीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मुलावर उपचार सुरू आहेत. प्राथमिकदृष्ट्या हा अपघात वाटत असला तरी, खरात प्रकरणातील महत्त्वाचा दुवा आणि साक्षीदार असल्यामुळे या घटनेकडे संशयाने पाहिले जात आहे.

अशोक खरातचे मुख्य सल्लागार आणि 'शिवनिका ट्रस्ट'चे उपाध्यक्ष होते. खरातच्या अटकेनंतर ते मानसिक तणावाखाली असल्याचेही बोलले जात होते. हा केवळ अपघात आहे की यामागे काही मोठे षडयंत्र आहे, याचा तपास आता पोलिस करत आहेत.

### कुणाला अडचण होती, घडवून आणले का ?

■ अजून पुढे न आलेले भोंदू खरातचे इतर काही कारनामे पुढे येऊ नयेत आणि त्यातून कुणी अडचणीत येऊ नये म्हणून तर हा अपघात घडवून आणला नाही ना? शंका घेण्याला वाव वाटतो. अपघाताची सखोल चौकशी व्हावी. तसेच खरातच्या चौकशीत अनेक गोष्टी पुढे येणार असल्याने त्याच्याही सुरक्षेची काळजी घ्यावी.- रोहित पवार, आमदार, राकाँ, पवार गट

## दुहेरी नागरिकत्व : राहुलवर एफआयआर

**▸विदर्भ केसरी। लखनौ**

कथित दुहेरी नागरिकत्व प्रकरणी अलाहाबाद हायकोर्टाने काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्यावर एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणातील आरोपांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. हायकोर्टाने उत्तर प्रदेश सरकारला निर्देश दिले की, या प्रकरणाचा तपास राज्याच्या तपास यंत्रणेमार्फत करावा किंवा कोणत्याही केंद्रीय एजन्सीकडे सोपवावा. राहुल यांच्याकडे भारतासोबतच ब्रिटनचेही नागरिकत्व असल्याचा आरोप याचिकाकर्ते विग्नेश शिशिर यांनी केला आहे. दोन देशांचे पासपोर्ट असणे हे भारतीय कायद्याचे उल्लंघन असल्याचे याचिकेत म्हटले आहे. रायबरेलीच्या कनिष्ठ न्यायालयाने ही याचिका फेटाळल्यानंतर हे प्रकरण हायकोर्टात पोहोचले होते.

'इंडियन स्टेट' बाबतचे विधान ठरणार डोकेदुखी : राहुल गांधींनी

१५ जानेवारी २०२५ रोजी केलेल्या एका विधानावरूनही कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. काँग्रेसच्या 'इंदिरा आरोप केले आहेत.भवन' या नव्या मुख्यालयाच्या उद्घाटनावेळी राहुल म्हणाले होते की, माझी लढाई केवळ भाजप आणि आरएसएसशी नाही, तर 'इंडियन स्टेट' (भारतीय राज्यव्यवस्था) शी देखील आहे. या विधानावर सिमरन गुप्ता यांनी याचिका दाखल केली आहे.

■ एमपी-एमएलए कोर्टाने फेटाळली होती याचिका

■ २८ जानेवारी रोजी लखनौच्या विशेष एमपी/एमएलए न्यायालयाने राहुल गांधीविरोधात एफआयआर नोंदवण्याची याचिका फेटाळून लावली होती. नागरिकत्वाच्या मुद्द्यावर निर्णय घेण्यास हे न्यायालय सक्षम नसल्याचे त्यावेळी सांगण्यात आले होते. या निर्णयाला शिशिर यांनी हायकोर्टात आव्हान दिले. याचिकाकर्त्याने राहुलवर भारतीय न्याय संहिता, शासकीय गुप्तता कायदा, परकीय नागरिक कायदा आणि पासपोर्ट कायद्यांतर्गत गंभीर आरोप केले आहेत.

## जनगणनेच्या पार्श्वभूमीवर झेडपी कर्मचाऱ्यांच्या बदल्या स्थगित

**▸विदर्भ केसरी।**

**: देशव्यापी जनगणना २०२६ च्या अत्यंत महत्त्वपूर्ण कामाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत निर्णायक आणि तातडीचा आदेश जारी केला आहे. जनगणनेचे काम वेळेत, अचूक आणि निर्विघ्न पार पडावे यासाठी जिल्हा परिषदांतील गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचारी तसेच शिक्षक यांची २०२६ मधील सर्वसाधारण बदली प्रक्रिया पूर्णतः स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

गृह सचिव, भारत सरकार यांनी जनगणना अधिनियम १९४८ आणि जनगणना नियम १९९० अंतर्गत दिलेल्या निर्देशांच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला असून, जनगणना कार्य हे वैधानिक आणि अत्यंत संवेदनशील स्वरूपाचे असल्याने कर्मचाऱ्यांची सातत्यपूर्ण उपलब्धता आणि स्थिरता आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या उपसचिव वैशाली डिगे यांनी जारी केलेल्या अर्धशासकीय पत्रानुसार, जनगणना कामाशी संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्यास प्रशासकीय कामकाजावर थेट परिणाम होण्याची शक्यता असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

याचबरोबर, या निर्णयाच्या अंमलबजावणीचा अनुपालन अहवाल त्वरित शासनाकडे सादर करण्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व जिल्हा परिषद प्रशासनांना या आदेशाचे काटेकोर पालन करणे बंधनकारक ठरणार आहे. या निर्णयामुळे जिल्हा परिषदांतील हजारो शिक्षक आणि कर्मचारी यांना मोठा दिलासा मिळाला असून, अचानक होणाऱ्या बदल्यांमुळे निर्माण होणारी अस्थिरता टळणार आहे.

■ **तसेच जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यासाठी प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम आणि स्थिर राहणार असल्याचे प्रशासनिक वर्तुळात मानले जात आहे. जनगणना २०२६ च्या पार्श्वभूमीवर घेतलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरत असून, आगामी काळात जनगणना प्रक्रियेच्या गतीवर याचा सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**



## अग्रलेख

# नेमेचि येतो उन्हाळा...

फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यानंतर विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांच्या तापमानात वाढ होण्यास सुरुवात होते. एप्रिल-मे महिन्यात तर तापमानाचा उच्चांक गाठला जातो. या महिन्यांमधील अनेक दिवस साधारणतः 43 ते 46 अंशापर्यंत तापमान कायम राहते. स्वाभाविकच या कालावधीत उष्माघाताचे अनेक बळी जातात. ही परिस्थिती गत काही वर्षांतील आहे असे नसले तरी तापमानाचा उच्चांक गाठणाऱ्या दिवसांमध्ये सतत वाढ होत आहे. म्हणूनच याकडे केवळ ऋतुबदलाचा परिणाम असे न पाहता वाढत असलेल्या तापमानाच्या कारणांची मीमांसा करणे आणि त्यासाठीच्या उपाययोजना सातत्याने, योग्य वेळेत करणे आवश्यक आहे. मुख्यतः वृक्षतोड आणि अन्य मार्गाने पर्यावरणाची होणारी हानी, झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण सोबतच हवामानातील बदल या सर्वांचा संयुक्त परिणाम तापमान वाढीवर होतो. सतत वाढणारे तापमान हे जीवघेणे ठरत आहे. दरवर्षी उष्माघाताने मृत्यू होणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे. दुर्दैवाने अनेक वेळा उष्माघाताच्या मृत्यूची नोंद योग्य पद्धतीने न झाल्याने प्रत्यक्ष आणि शासकीय आकडेवारीत तफावत जाणवते. यावर्षी देखील वर्धा, अकोल्यात एकाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे मानवी जीविताच्या रक्षणासाठी यावर उपाययोजना गरजेच्या आहेत. 'नेमेचि येतो उन्हाळा' असे म्हणून दुर्लक्ष करणे हे भविष्यातील अडचणी वाढविणारे ठरेल. सतत वाढणारे तापमान आणि उन्हाळ्यातील उष्माघाताने होणारे मृत्यू ही समस्या केवळ विदर्भातील नागपूर, अकोला, चंद्रपूर, वर्धा, अमरावती या शहरांचीच नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, शहर आणि खेड्याची आहे. अशाच प्रकारच्या समस्येने गुजरातमधील अहमदाबाद शहर त्रासले होते. मात्र त्यांनी काही उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली आणि त्यानंतर येथे उष्माघाताच्या मृत्यूच्या संख्येत कमालीची घट झाली. अहमदाबाद हे देशातील 'हिट ॲक्शन प्लॅन' यशस्वीपणे राबविणारे पहिले शहर आहे. 2010 साली भीषण उष्णतेच्या लाटेत अहमदाबाद येथे अनेकांचा मृत्यू झाला. त्यानंतर 2013 मध्ये स्थानिक महानगरपालिकेने पूर्वसूचना प्रणाली, जनजागृती, नागरिकांनी घ्यावयाची काळजी या मुद्यांवर शासकीय यंत्रणांसह विविध सामाजिक संस्थांनी काम केले. परिणामी उष्माघाताचे मृत्यू घटले. या ॲक्शन प्लॅनला जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता मिळाली. तर देशातील 30 शहरांनी अशा प्रकारची योजना अंमलात आणली. वाढत्या तापमानामुळे होणाèया मृत्यूसाठी अशा प्रकारची सूक्ष्म योजना करणे आवश्यक असले तरी मुळात तापमान वाढू नये याकरिता देखील सर्वच स्तरातून प्रयत्नांची गरज आहे. खरं तर सर्वत्रच वाढते काँक्रिटीकरण आणि कमी होणारी हिरवळ ही मूळ समस्या आहे. कारण एका संशोधनानुसार, काँक्रिट पृष्ठभाग सूर्य ऊर्जा 80-90 टक्के शोषतो, तर हिरवळ केवळ 20-30 टक्के उष्णता शोषते. म्हणूनच यावर सर्वोत्तम उपाय हा गाव, खेडे, शहरात ठिकठिकाणी 'हरित पट्टे' निर्माण करणे हा ठरू शकतो. वृक्ष, उद्याने, जलस्रोत, हिरवळ हे केवळ सौंदर्यवर्धनासाठी नसून ती तापमान नियंत्रणाची नैसर्गिक यंत्रणा आहे. 'हरित पट्टे' असलेल्या भागात 2 ते 8 अंश सेल्सिअस तापमान कमी असते. तर हिरवळ वाढल्यास हवेतील प्रदूषण देखील 20 ते 30 टक्के कमी होते. झाडांच्या सावलीखाली असलेल्या भागात जमिनीचे तापमान 10 ते 15 टक्के कमी असते. असे एक ना अनेक फायदे हरित पट्ट्यांचे आहेत. सुदैवाने अद्याप तरी शहरात आणि शहरालगत मोठ्या प्रमाणात शासकीय जागा उपलब्ध असून याठिकाणी प्रशासकीय यंत्रणेसोबत विविध सामाजिक संस्थाद्वारे हरित पट्टे निर्माणाचे कार्य करता येईल.heatstroke मोठ्या शहरात नागरिकांनी उजाड झालेल्या बगिच्यांच्या संवर्धनासाठी, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपणासाठी पुढाकार घेत तर शासनाने बांधकाम नियमांमध्ये 20 ते 30 टक्के हिरवळ, वृक्षतोडीवर कडक नियंत्रण असे धोरणात्मक निर्णय घेतले तर पुढील काही वर्षात वाढत्या तापमानाच्या समस्येवर नियंत्रण मिळविता येईल.आपल्या संस्कृतीत 'माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' अर्थात ही वसुंधरा आमची माता आहे आणि आम्ही तिचे पुत्र आहोत, असे म्हटले आहे. म्हणून स्वाभाविकच वसुंधरेच्या रक्षणासाठी आवश्यक असणारी प्रत्येक बाब आपले कर्तव्य आहे. पर्यावरण संवर्धन आणि संरक्षण हे देखील महत्त्वाचेच. म्हणूनच रा. स्व. संघाने पंचपरिवर्तनात पर्यावरण या विषयाचाही समावेश केला आहे. वाढते तापमान हे अपमृत्यूला कारणीभूत ठरणारे असून एक प्रकारची ती आरोग्य आणिबाणी म्हणावी लागेल. यावर मात करण्यासाठी समाजातील सज्जन शक्तीला पुढाकार घ्यावा लागेल हे निश्चित!

# विहिंप, बजरंग दलाचे धरणे आंदोलन

**विदर्भ केसरी। वर्धा,**

देशभरात वाढणाऱ्या जिहादी मानसिकतेच्या विरोधात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने आज १७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन पाठवण्यात आले. राष्ट्रपतींना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद केल्यानुसार, नाशिकसह राज्यात घडत असलेल्या अलीकडील घटनांवरून लव्ह जिहादचे जाळे आता सुशिक्षित आणि व्यावसायिक क्षेत्रापर्यंत पसरले आहे. उत्तरप्रदेशातील जिहादी चांगूर उर्फ मालुद्दीन आणि त्याची महिला सहकारी नसरीन यांनी अनेक हिंदू मुलींचे शारीरिक शोषण केले. त्यांना ब्लॅकमेल केले आणि त्यांचे धर्मांतर करण्यास भाग पाडले. दिल्लीतील लाल किल्ल्यावरील बॉम्बस्फोटात अल फलाह विद्यापीठाशी संलग्न असलेल्या जिहादी मानसिकतेच्या मुस्लिम डॉटरांनी बॉम्बस्फोट घडवून आणला. देशभरात संरक्षित जमिनींवर पद्धतशीरपणे अतिक्रमण केले जात आहे.

त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला थेट आव्हान निर्माण झाले आहे. समाजात द्वेष पसरवण्याच्या उद्देशाने अन्नपदार्थांची विटंबना करण्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. मुस्लिमबहुल भागांमध्ये, अल्पसंख्याक हिंदू कुटुंबांतील आणि आदिवासी समुदायांतील अल्पवयीन मुलींचे शारीरिक आणि मानसिक शोषण केले जात आहे आणि त्यांना स्थलांतर करण्यास भाग पाडले जात आहे. अशा राष्ट्रविरोधी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर तात्काळ कठोर आणि दंडात्मक कारवाई



करावी, सार्वजनिक आणि सरकारी जमिनींवरील सर्व अवैध अतिक्रमणे तात्काळ हटवावी, लव्ह जिहाद आणि सतीच्या धर्मांतरासारख्या कृत्यांना आळा घालून कठोर केंद्रीय कायद्यांची अंमलबजावणी करावी, आदिवासी भागांमध्ये होणारे शोषण थांबवण्यासाठी विशेष सुरक्षा यंत्रणा विकसित करावी, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. देशात शांतता आणि सलोखा टिकून राहावा यासाठी प्रशासनाने या समाजकंटकांवर अंकुश ठेवावा, अशी मागणी करण्यात आली. अटल पांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या आंदोलनात अरविंद कोकाटे, किरण उपाध्याय, विजय छंगानी, संजय पोफळी, पंकज ढाकुलकर, अभिजित कुसाराम, अश्विन साहू, आदी उपस्थित होते.

# अघोरी पुजेसाठी कासव तस्करी

**विदर्भ केसरी। सावली,**

अघोरी पुजेसाठी कासव तस्करी होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणातील आरोपींच्या भ्रमणध्वनीत अघोरी पुजेच्या चित्रफीती, स्मशानभूमीत मध्यरात्री केलेल्या अशुभ विधींचे चित्रीकरण तसेच घुबड व कासवांचे फोटो आढळले.

याशिवाय अनेक तरुण मुली आणि विधवा महिलांच्या छायाचित्रांसह त्यांच्या जन्मकुंडल्या व अत्यंत खाजगी स्वरूपाची माहितीही सापडली. काही महिलांच्या मासिक पाळीच्या तारखांची नोंद ठेवण्यात आल्याचेही उघड झाले आहे. या सर्व प्रकारामुळे महिलांचे मोठ्या प्रमाणावर लैंगिक शोषण झाल्याची शक्यताही आता व्यक्त होत आहे. दरम्यान, सावली तालुक्यात कासवांची तस्करी करणाऱ्या आंतरतालुका टोळीचा वनविभागाने पर्दाफाश केला आहे. व्याहाड खुर्द उपक्षेत्रातील चिचडोह बॅरेज परिसरात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या 6 आरोपींना गुरुवारी सावली न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने तीन आरोपींना वनकोठडी, तर तिघांची रवानगी कारागृहात केली. लवकर श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी अघोरी पूजा करून महिलांना फसवण्याचे रॅकेट चालवण्याचा हा प्रकार आहे. त्यासाठी मूल आणि पोंभुर्णा तालुक्यातील आरोपींनी वन्यजीव कायद्याचे उल्लंघन करून कासवांची तस्करी सुरू केली होती. 12 एप्रिल रोजी सायंकाळी वनविभागाला माहिती मिळाली. त्या आधारे चिचडोह बॅरेज ते हरंबा या कच्च्या रस्त्यावर सापळा रचण्यात आला. संशयास्पदरित्या वावरणाऱ्या टोळीला घेरले असता, त्यांच्याकडे दोन मोठे कासव, दुचाकी आणि भ्रमणध्वनी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात आरोपी गंगाधर पांडू बुरांडे (49), मोरेश्वर देविदास देवतळे (38, दोघेही रा. जाम खुर्द), ओमदेव शिंदे (25), हेमचंद उमाजी शेंडे (28), धवल उष्ट्र वेलादी (30, तिघेही रा. गणपूर) आणि राजेंद्र शाम दिवसे ( 52, रा. चकनवेगाव) यांना अटक करण्यात आली. आरोपींविरुद्ध वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 चे कलम 9,39,49, 50 व 51 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

# कमांडर 'सहदेव'सह ४ नक्षलवादी ठार

**विदर्भ केसरी। गडचिरोली :**

झारखंडमधील चतरा आणि हजारीबाग जिल्ह्यांच्या सीमावर्ती बटुका परिसरात शुक्रवारी सुरक्षा दलांनी केलेल्या एका मोठ्या कारवाईत चार जहाल नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आले. यामध्ये १५ लाख रुपयांचे बक्षीस असलेला नक्षल्यांचा सबझोनल कमांडर सहदेव महतो याचा समावेश असून, या कारवाईमुळे नक्षलवादी संघटनेला मोठा हादरा बसला आहे.

गोपनीय सूत्रांकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, हजारीबागचे पोलीस अधीक्षक सुमित कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली कोब्रा बटालियन आणि स्थानिक




पोलिसांनी या भागात संयुक्त शोधमोहीम हाती घेतली होती. जंगलात दबा धरून बसलेल्या नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरू केला. जवानांनीही तात्काळ चोख प्रत्युत्तर दिले. सुमारे दोन तास चाललेल्या चकमकीत चार नक्षलवादी जागीच ठार झाले, तर काही जखमी नक्षलवादी घनदाट जंगलाचा फायदा घेत पसार झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

चकमकीनंतर राबवण्यात आलेल्या शोधमोहिमेत ठार झालेल्या चारही नक्षलवाद्यांची ओळख पटली आहे. मृतांमध्ये प्रामुख्याने जहाल नक्षली सहदेव महतो, महिला नक्षलवादी नताशा, एरिया कमांडर बुधन करमाली आणि बुद्धदेव यांचा समावेश आहे. घटनास्थळावरून दोन एके-४७ रायफली, एक इन्सास, एक कोल्ट एआर रायफल, जिवंत काडतुसे, देशी बनावटीची शस्त्रे आणि मोठ्या प्रमाणात नक्षलवादी साहित्य जप्त करण्यात आले आहे. गेल्या तीन दिवसांत झालेल्या आयईडी स्फोटांत ६ जवान जखमी झाल्याने या परिसरात तणावाचे वातावरण होते. मात्र, शुक्रवारी मिळालेल्या या मोठ्या यशामुळे सुरक्षा दलांचे मनोधैर्य उंचावले आहे.

**■ दरम्यान, नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य असलेल्या मिसिर बेसराला पकडण्यासाठी जवानांनी सारंडा जंगलात सध्या कडक नाकेबंदी आणि सापळा रचला आहे. आतापर्यंत जवानांना हुलकावणी देण्यात यशस्वी ठरलेल्या बेसराच्या मुसक्या आवळण्यासाठी सुरक्षा दलांनी विशेष रणनीती आखली असून, लवकरच तो देखील पकडल्या जाईल असा दावा सुरक्षा यंत्रणांकडून व्यक्त केल्या जात आहे.**

# पतीच्या त्रासामुळे पत्नीची आत्महत्या




**विदर्भ केसरी। आर्णी,**

तालुक्यातील बोरगाव येथे काल रात्री भाजी जमली नाही, या कारणावरून पती-पत्नीत झालेल्या वादात पत्नीने घरात विष प्राशन केले. तिला आर्णीला दवाखान्यात आणले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले.

बोरगाव येथील नामदेव जाधव याचे लग्न देवगाव येथील चेतनाशी झाले होते. यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. मनोज हा दारूच्या आहारी गेला असून नेहमी पत्नीसोबत वाद घालायचा. यातच गुरुवारी रात्री मनोज आपल्या मित्राला घरी घेऊन आला.

दोघेही जेवायला बसले असता मनोजने पत्नी चेतनासोबत भाजी चांगली झाली नाही यावरून वाद घातला. चेतना घरात गेली आणि विष पिऊनच बाहेर आली व म्हणाली, मी पोट भरून विष प्यायली आहे, आता तुम्ही शांतीने रहा. तिला आर्णी दवाखान्यात आणले असता डाक्टरांनी मृत घोषित केले. मृतका चेतनाचे मामा मनोहर राठोड यांच्या तक`ारीवरून आर्णी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक पल्लवी निनगुरकर तपास करीत आहेत.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## महत्त्वाचे

### उष्णतेचा कहर! नागपूर जिल्ह्यात शाळांना तातडीची सुट्टी जाहीर

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे, प्रतिनिधी**

नागपूर : नागपूर जिल्ह्यात उष्णतेचा प्रचंड तडाखा बसत असून परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या 'यलो अलर्ट'च्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झाले असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्या आदेशानुसार शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस बंद ठेवण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी केला आहे. वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असून विशेषतः विद्यार्थ्यांना मोठा धोका असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, उष्णतेच्या लाटेमुळे जिल्ह्यात चिंतेचे वातावरण असून नागरिकांनी दुपारच्या उन्हात बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे व स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. उष्णतेचा इशारा गंभीर — प्रशासन सज्ज, नागरिकांनीही सतर्क राहणे गरजेचे!

### अवैध रेती तस्करीचा गंभीर आरोप; तलाठी मनोज नागोटे यांच्यावर कारवाईची मागणी

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे, प्रतिनिधी**

कुही तालुक्यातील राजोला परिसरात अवैध रेती तस्करीचा मोठा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकारात संबंधित तलाठी मनोज नागोटे यांच्यावर संशयाची सुई निर्देशित होत असून, रेती माफियांशी संगनमत केल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परिसरात अनेक वर्षांपासून अवैध रेती उत्खनन आणि वाहतूक सुरू आहे. मात्र, याबाबत प्रशासनाला कोणतीही ठोस माहिती पोहोचू नये यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. स्थानिकांच्या मते, काही महसूल अधिकारी आणि रेती तस्कर यांच्यातील कथित साटेलोटेमुळेच हा अवैध व्यवसाय बिनधास्तपणे सुरू आहे.
नागरिकांचे म्हणणे आहे की, शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवत नैसर्गिक संपत्तीची मोठ्या प्रमाणात लूट होत आहे. यामुळे शासनाचा महसूलही बुडत असून पर्यावरणीय समतोल धोक्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित तलाठी मनोज नागोटे यांच्यावर तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान, कुही तालुक्याचे तहसीलदार यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन वस्तुस्थिती समोर आणावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. प्रशासनाने वेळेत पावले उचलली नाहीत, तर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

### मांढळ पोस्ट ऑफिसचा 'सुविधा परिवर्तन'कडे वेगवान प्रवास; नागरिकांना दिलासा

**▸विदर्भ केसरी। , राजहंस शेंडे**

मांढळ (जि. नागपूर) : नागरिकांच्या अडचणींची गांभीर्याने दखल घेत




मांढळ येथील पोस्ट ऑफिसमध्ये सर्वांगीण सुधारणा उपक्रमांना वेग आला असून, सेवा अधिक सुलभ, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख करण्याचा ठोस निर्धार प्रशासनाने व्यक्त केला आहे. या बदलांमुळे पोस्ट ऑफिसची कार्यपद्धती आधुनिकतेकडे वाटचाल करत असल्याचे स्पष्ट होत आहे. पोस्ट ऑफिसमध्ये येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था, आरामदायी बसण्याची सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र व सन्मानजनक सोयी उभारण्याचे काम प्राधान्याने सुरू आहे. वाढत्या गर्दीचा विचार करून सेवा व्यवस्थापन अधिक सुटसुटीत आणि जलद करण्यावरही भर देण्यात येत आहे. आर्थिक व्यवहारांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तसेच सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. बचत खाते, आर.डी. आणि डी.बी.टी.सारख्या सेवांमध्ये पारदर्शकता व गती वाढवून "वेळेत सेवा" हा मंत्र प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. या सर्व सुधारणा प्रभावीपणे राबविल्या जाव्यात यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी पाहणी केली जाणार आहे. त्यामुळे सेवा दर्जात सातत्याने सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या सकारात्मक बदलांमुळे मांढळ परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच हे पोस्ट ऑफिस आदर्श व अत्याधुनिक सेवांचे केंद्र म्हणून ओळखले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# त्या कर्मचाऱ्यांच्या बेकायदेशीर वापर !

## मुख्याधिकाऱ्याविरोधात नगरसेवकाची तक्रार ; ढाणकी येथील प्रकार



**▸विदर्भ केसरी। ढाणकी । प्रतिनिधी :मिलिंद चिकटे**

■ स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शहरातील प्रत्येक घरावर स्कॅनर लावण्यात आलेले आहेत. दररोज कचरा उचलण्यात येणाऱ्या कचरा गाडी व कर्मचाऱ्यांनी कचरा उचलल्यानंतर त्या स्कॅनरला स्कॅन करणे अनिवार्य असताना, शहरात आजच्या स्थितीत दहा दिवसाआड घनकचऱ्याची गाडी येत असून, प्रत्येक घरावरील स्कॅनिंग ही कंत्राटदाराने काही मुले रोजंदारीने लाऊन घरबसल्या स्कॅनिंग करुन घेत असल्याची सुद्धा शहरात चर्चा आहे.
घनकचरा व्यवस्थापनाबद्दल एवढी बिकट परिस्थिती ढाणकी शहरात असून, जिल्हाधिकारी महोदय यावर काय ॲक्शन घेणार ? यातील दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार ? सदर कंत्राटदारास ब्लॅकलिस्टेड करणार का ? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

ढाणकी नगरपंचायत मार्फत घनकचरा निविदिता काढून, विशिष्ट कंत्राटदार राजवीर पाटील नांदेड निविदिता मंजूर करून, घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणेकामी, कंत्राटी पद्धतीने त्यांनी गावातील म्हणजेच ढाणकी नगरपंचायत हद्दीतील व्यक्तीची घनकचरा उचलण्यात आणि तसेच विल्हेवाट लावण्याकामी भरती करून घेतली. परंतु एकूण नियुक्त केलेल्या भरतीतील मनुष्यबळाची संख्या ही माहितीप्रमाणे ३३ आहे. परंतु त्यातील ०३ कंत्राटी कर्मचारी हे सतत गैरहजर राहतात व उर्वरित ३० कर्मचाऱ्यापैकी शासकीय पदस्थापनेच्या जागी , कंत्राटी पद्धतीने भरती केलेल्या ८ कर्मचाऱ्यांची , कोणतीही शासन पद भरतीविना बेकायदेशीरपणे, घनकचरा कर्मचाऱ्यांचा त्यांच्या कंत्राटी कामाऐवजी उपयोग करून, शासनाकडून शासकीय पदांचा भरणा न करता, काही विशिष्ट पदाचा येणारा शासन निधी हा, विना नियुक्त व्यक्तींच्या नावाने शासनाची फसवणूक करून, मुख्याधिकारी नगरपंचायत ढाणकी हे शासनाकडून मानधन लाटत आहेत. तसेच त्यांच्या या गैर कायदेशीर व बेकायदेशीर कृत्यामुळे नगरपंचायत हद्दीतील आवश्यक ती कामे तसेच घनकचरा उचलणे व इतर आवश्यक ती कंत्राटी पद्धतीने निविदेतील कामे खोळंबून पडलेली असल्याने, त्यांच्याविरुद्ध योग्य ती चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अशा आशयाचे निवेदन प्रभाग क्रमांक १ मधील नगरसेवक परमेश्वर गंभीर निम्मलवाड यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांना दिले. ढाणकी नगरपंचायत येथे कर्मचारी व अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार असल्याचे वेळोवेळी नागरिक बोलून दाखवतात. आता तर नगरसेवकानेच घनकचरा व्यवस्थापनाबाबत गंभीर तक्रार दाखल केली आहे. येथील घनकचरा व्यवस्थापनात नगरपंचायत चा एक बडा अधिकारी पार्टनर असल्याचीही चर्चा शहरात आहे.

# महसूल विभागाचा वाळू माफियांना दणका



## आर.आय. कांबळे म्याडम यांची धडाकेबाज कारवाई

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**

तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून अवैध रेती मुरूम तस्करांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, पर्यावरणासह शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत आहे. या प्रकाराला आळा घालण्यासाठी तहसीलदार शुभम बहाकर यांनी आता कंबर कसली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. याचाच एक भाग म्हणून आज दुपारी मंडळ अधिकारी (आर.आय.) कांबळे मॅडम यांनी धाडसी कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारा एक हायवा आणि एक ट्रॅक्टर जप्त केला आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आ धारे, आर.आय. कांबळे यांनी आपल्या पथकासह दुपारी अचानक छापा टा क ला. यावेळी कोणतीही अधिकृत रॉयल्टी किंवा कागदपत्रे नसताना रेतीची अवैध वाहतूक करणारा एक हायवा ट्रक आणि ए क ट्रॅक्टर रंगेहात पकडण्यात आला. म हसूल विभागाच्या या अचानक पड लेल्या धाडीमुळे वाळू माफियांमध्ये एकच ख ळ बळ उडाली आहे. जप्त केलेली दोन्ही वाहने स ध्या तहशील प्रशासनाच्या ताब्यात आली असून पुढील दंडात्मक कारवाई सुरू आहे. गोंडपिपरी परिसरात वाळू तस्करीचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे. तह सीलदार यांनी या तस्करांविरुद्ध युद्ध पुकारले असले, तरी खालच्या स्तरावरील यंत्रणेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

जर एक महिला अधिकारी (आर. आ य.) भरदिवसा रस्त्यावर उतरून धाडसी कारवाई करू शकतात, तर इतर क्षेत्रीय कर्मचारी आणि संबंधित विभागाचे लोक याकडे डोळेझाक का करत आहेत? असा सवाल आता सामान्य नागरिकांमधून विचारला जात आहे. एकीकडे अधिकारी कारवाई करत अ सताना, दुसरीकडे तस्करांचे धाडस कसे वाढते, हा चिंतेचा विषय आहे. "इतर कर्मचारी हे प्रकार का बघू शकत नाहीत?" किंवा "त्यांना हे का दिसत नाही?" याचा शोध आणि चिंतन आता वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी करणे गरजेचे झाले आहे. केवळ कागदोपत्री कारवाई न करता, तळागाळातील कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित केल्यास तालुक्यातील अवैध रेती उपशाला पूर्णपणे लगाम घालता येईल, अशी चर्चा परिसरात आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे प्रामाणिक अ धिकाऱ्यांचे कौतुक होत असले, त री वाळू तस्करीचे हे 'अर्थकारण' मुळापासून उपटून टाकण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे आहे.

## मुलाचा विहिरीत पडून मृत्यू

**▸विदर्भ केसरी। ढाणकी**



उमरखेड तालुक्यातील बिटरगाव बु. येथे यात्रा पाहण्यासाठी गेलेल्या आनंदा अशोक वड्डेल्लू (वय १६, रा. बेलगाव मंडळ कबीर) या मुलाचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, आता या घटनेबाबत परिसरात विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. ही घटना केवळ अपघात आहे की त्यामागे काही वेगळे कारण आहे, याबाबत उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे. आनंदा हा आपल्या आजोबांकडे बिटरगाव येथे राहून शिक्षण घेत होता. बुधवारी रात्री १० ते ११ च्या सुमारास गावात सुरू असलेली यात्रा पाहण्यासाठी तो घराबाहेर पडला. रात्रीच्या अंधारात जमिनीच्या लेव्हलला असलेल्या विहिरीचा अंदाज न आल्याने तो त्यात कोसळल्याचे प्राथमिक वृत्त आहे. त्याला तातडीने ढाणकी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत सुरक्षेचा अभाव: विहीर जमिनीच्या पातळीवर असूनही तिला संरक्षक भिंत किंवा जाळी का नव्हती? यात्रेच्या काळात गर्दी असताना प्रशासनाने अशा धोकादायक ठिकाणांची सुरक्षितता का तपासली नाही? अंधाराचे साम्राज्य: यात्रेनिमित्त परिसरात पुरेशी प्रकाश व्यवस्था होती का?
रात्रीच्या वेळी नेमकी ही दुर्घटना कशी घडली, याबाबत काही नागरिक दबक्या आवाजात शंका व्यक्त करत आहेत. या प्रकरणाचा तपास बिटरगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या मार्गदर्शनात पोलीस जमादार संतोष चव्हाण आणि पो. अंमलदार दत्ता कवडेकर करत आहेत. शवविच्छेदन अहवाल आणि पोलिसांच्या सखोल तपासानंतरच या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. दरम्यान, बेलगाव आणि बिटरगाव परिसरात या घटनेमुळे मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

# संजय धनाडे यांना विधान परिषदेवर संधी द्या.

### राज्यातील १ लाख बेरोजगारांची मुख्यमंत्र्यांकडे साद.

### अकोल्याचे 'बेरोजगारांचे नेते' विधानभवनात पोहोचावे यासाठी सोशल मीडियावरून महामोहीम.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

गेल्या अडीच ते तीन दशकांपासून बेरोजगार आणि प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी रस्त्यावरची लढाई लढणारे जननेते संजय धनाडे यांना विधान परिषदेवर नियुक्त करावे, अशी आग्रही मागणी आता जोर धरू लागली आहे. राज्यातील तब्बल एक लाख बेरोजगार युवक एसएमएस, ई-मेल आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे ही मागणी करणार आहेत. २५ वर्षांचा प्रदीर्घ संघर्ष संजय धनाडे यांनी गेल्या २५-३० वर्षांपासून बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेच्या माध्यमातून युवकांचे संघटन केले आहे. केवळ मोर्चे किंवा आंदोलने न करता, त्यांनी शासन दरबारी युवकांचे प्रश्न अत्यंत आक्रमकपणे रेटून धरले आहेत. बेरोजगार तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न असो वा त्यांच्या शैक्षणिक अडचणी, धनाडे यांनी नेहमीच जिव्हाळ्याने हे प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे.



■ **उपशोषितांचा बुलंद आवाज.**

केवळ शहरी युवकच नव्हे, तर ग्रामीण भागातील गोरगरीब, दलित, महिला आणि आदिवासी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी धनाडे यांनी कौशल्यपूर्ण काम केले आहे. अनेक प्रलंबित प्रश्नांवर त्यांनी शासनाशी चर्चा करून मार्ग काढले आहेत. त्यांच्या या अनुभवाचा फायदा विधान परिषदेत झाल्यास राज्यातील लाखो बेरोजगारांचे प्रश्न खऱ्या अर्थाने मार्गी लागतील, अशी भावना युवकांमध्ये आहे. सोशल मीडियावरून जनरेटा. संजय धनाडे यांना आमदार म्हणून संधी मिळावी यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातील तरुण एकवटला आहे. "बेरोजगारांचा नेता विधानभवनात हवा," या टॅगलाईनखाली एक मोठी मोहीम राबवली जात आहे. १ लाख युवकांचे समर्थन असलेले पत्र आणि ई-मेल वरिष्ठ नेत्यांना पाठवून, महायुती सरकारने या सामान्य कार्यकर्त्याला न्याय द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

> ■ **संजय धनाडे यांच्यासारखा अभ्यासू आणि जमिनीवर काम करणारा नेता जर विधान परिषदेत गेला, तर तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न धोरणात्मक पातळीवर सुटू शकेल. म्हणूनच आम्ही ही मागणी लावून धरली आहे.**
> **> बेरोजगार युवक प्रतिनिधी**

## उजाड गावांतील 'भुताटकी' मतदारांवर प्रशासनाची कारवाई

**▸विदर्भ केसरी। राजेंद्र चव्हाण**

**दारव्हा /** माहिती अधिकारातून उघड झालेल्या धक्कादायक माहितीनंतर उजाड झालेल्या गावांमध्ये अद्याप नोंद असलेल्या 'भुताटकी' मतदारांवर प्रशासनाने कारवाईची तयारी सुरू केली आहे. दारव्हा उपविभागीय अधिकाऱ्यांनी संबंधित तहसीलदारांना अशा मतदारांची चौकशी करून नियमांनुसार निवडणूक यादीतून नावे वगळण्याचे निर्देश दिले आहेत.

उपविभागीय अधिकारी कार्यालय, दारव्हा येथून दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी या संदर्भात अधिकृत पत्र जारी करण्यात आले आहे. राष्ट्रवादी मातृभूमी भेदभाव निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. भीमराव राठोड यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने ही प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

माहिती अधिकार कायद्याअंतर्गत यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीत काही गावांची संख्या तसेच पूर्णपणे उजाड झालेल्या गावांचा तपशील समोर आला आहे. त्या पार्श्वभूमीवर नेर, दारव्हा आणि दिग्रस तालुक्यातील अशा गावांमध्ये अद्याप नोंद असलेल्या मतदारांची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तहसीलदारांनी प्रत्यक्ष पडताळणी करून नियमांनुसार निवडणूक यादीतून अशा मतदारांची नावे वगळण्याबाबत आवश्यक ती कारवाई करावी, तसेच झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल उपविभागीय अधिकारी कार्यालयाला सादर करावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित अर्जदारालाही या कारवाईची माहिती देण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने हे पत्र जारी करण्यात आले असून या निर्णयामुळे उजाड गावांतील मतदार नोंदींचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

## उद्या संतनगरी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन

**१०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय; सर्व तज्ज्ञ सेवा एकाच छताखाली!**

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा।**




शेगाव शहरातील गोलखेड रोड परिसरात उभारण्यात आलेल्या 'संतनगरी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'चे उद्घाटन उद्या, रविवारी (दि.१९ एप्रिल) होणार आहे. १०० खाटांची क्षमता असलेल्या या रुग्णालयात आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयात कार्डिओलॉजी, नेफ्रोलॉजी, क्रिटिकल केअर, पेडियाट्रिक्स, न्यूरोलॉजी, जनरल सर्जरी, ऑन्कोलॉजी, स्त्रीरोग, ऑर्थोपेडिक्स, न्यूरोसर्जरी आदी विभागांची सुविधा उपलब्ध आहे. तसेच अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, आयसीयू, रेडिओलॉजी (सीटी स्कॅन, सोनोग्राफी, एक्स-रे), पॅथॉलॉजी, ब्लड स्टोरेज, फिजिओथेरपी व २४ तास आपत्कालीन सेवा उपलब्ध राहणार आहेत. रुग्णांना एकाच ठिकाणी सर्व वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने हे रुग्णालय सुरू करण्यात येत असून, मेडिक्लेम सुविधाही उपलब्ध आहे. माहितीनुसार, जिल्ह्यातील पहिले १०० खाटांचे मल्टीस्पेशालिटी रुग्णालय म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे. उद्घाटन सोहळ्यास विविध मान्यवर उपस्थित राहणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन हॉस्पिटलचे संचालक डॉ.प्रविण जनार्धन पाटील, डॉ.अपर्णा पाटील, डॉ.रणजित देशमुख, डॉ.अस्मिता देशमुख, उत्तमराव तांदळे, राहुल तांदळे व संकेत तांदळे यांनी केले आहे.

# तपस्वी संत श्री काशिनाथ बाबा आश्रम शाळा प्रवेशद्वारासमोर गतिरोधक बसवण्याच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**जिल्हा प्रशासनाकडून मागणीची दखल न घेण्यात आल्यास विद्यार्थ्यांना घेऊन स्थानिक करणार आंदोलन**



**▸विदर्भ केसरी। मानोरा :**

तालुक्यातील तीर्थक्षेत्र वाई गौळ (अमरगड) ह्या गावाच्या सीमेवर असलेल्या तपस्वी संत श्री काशिनाथ महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा तथा देवस्थानाच्या मध्यभागातून निर्माण करण्यात आलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक सुसाट वाहतुकीला लगाम घालून विद्यार्थी, श्रद्धाळू व नागरिकांचे संभाव्य अपघात टाळण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आलेल्या लेखी मागणीची दखल घेण्यात न आल्यास आंदोलन उभारण्याचा इशारा गोपाल महाराज (राठोड) यांच्यावतीने जिल्हा प्रशासनाला देण्यात आला आहे. वाई गौळ येथील तपस्वी संत श्री काशिनाथ बाबा आश्रम शाळेत परिसरातील विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळेचे प्रवेशद्वार थेट राष्ट्रीय महामार्गाला लागून आहे. महामार्गाचे काम झाल्यापासून या मार्गावर अवजड वाहने, ट्रक आणि खासगी वाहने सुसाट वेगाने धावतात. शाळा सुटल्यावर विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना मोठा धोका निर्माण होतो. दर्शनासाठी मंदिरात दररोज असंख्यभक्त मंडळी सुद्धा येत असतात व येथे धार्मिक व विवाहादी कार्यक्रम नेहमी होत असल्याने वर्दळ असते. येथे कोणतेही गतिरोधक, वेगमर्यादेचे फलक किंवा झेब्रा क्रॉसिंग नसल्याने अपघाताचा धोका कायम आहे.

■ **देवस्थानामुळे येथे भाविकांचीही मोठी वर्दळ असते. त्यामुळे गतिरोधकांची मागणी तातडीची असून जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.**

### स्थानिकांची मागणी:

■ **गतिरोधक: शाळेच्या प्रवेशद्वारासमोर दोन्ही बाजूंना शास्त्रोक्त पद्धतीचे गतिरोधक बसवावेत. 'शाळा क्षेत्र', 'वेगमर्यादा २० किमी' असे सूचनाफलक लावावेत व विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे मारावेत.**

### प्रशासनाचे दुर्लक्ष:

■ **या मागणीसाठी स्थानिक गोपाल महाराज (राठोड) यांनी जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडे या महिन्याच्या प्रारंभी लेखी निवेदन दिले आहे. मात्र दोन आठवडे उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. प्रशासनाने आठ दिवसांत गतिरोधक बसवण्याचे काम सुरू न केल्यास शाळेतील विद्यार्थी, पालक व भाविकांना सोबत घेऊन महामार्गावर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा गोपाल महाराज (राठोड) यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होत असल्याने आता गप्प बसणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली.**

## संत शिरोमणी गोरोबा काका पुण्यतिथी मेडशीत साजरी



**▸विदर्भ केसरी। विठ्ठल भागवत**

संत गोरा कुंभार हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक थोर संत होते. पांडुरंगाचे निस्सीम भक्त असलेल्या गोरोबा काकांचे वीस अभंग आज आपल्याला पहायला मिळतात.संत मंडळींमध्ये संत गोरोबा काका हे वडील होते.संत महात्म्यांना ते परम वंदनीय आणि आदरणीय होते.त्यामुळे सर्व संतांनी त्यांना "काका" ही उपाधी बहाल केली होती.संत गोरोबा काका ज्यांना गोरा कुंभार म्हणूनही ओळखले जाते. हे वारकरी संप्रदायातील एक प्रसिद्ध संत होते.ते एक कुंभार होते आणि विठ्ठलाचे भक्त होते.त्यांनी अनेक अभंग लिहिले आणि गायले,तसेच भागवत धर्माचा प्रसार केला.ते आपल्या कुंभार व्यवसायातून स्वतःचे घर चालवत होते आणि त्याच वेळी ते संतांच्या मार्गावर चालत होते.ते विठ्ठलाचे खूप मोठे भक्त होते आणि त्यांनी अनेक अभंग लिहिले आणि गायले. त्यांनी भागवत धर्माचा प्रसार केला आणि लोकांना चांगले जीवन जगण्याची प्रेरणा दिली.त्यांची समाधी तेर गावी उस्मानाबाद जिल्हा येथे आहे.त्यांच्या जीवनावरील अनेक कथा प्रसिद्ध आहे. त्यांच्या जीवनातील कथा त्यांच्या भक्तीचे आणि त्यागचे उदाहरण आहेत. अश्या महान संताची पुण्यतिथी मेडशी येथे दरवर्षी मोठ्या थाटाने व उत्साहाने साजरी केली जाते.आणि गावातील कुंभार बांधवाकडून हया दिवशी सर्व गावकरी मंडळी करिता भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.

## नारीशक्ती वंदन अधिनियमाला समर्थन

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

महिलांच्या सन्मान, सक्षमीकरण आणि राजकीय सहभागाला बळ देणाऱ्या नारीशक्ती वंदन अधिनियम या ऐतिहासिक निर्णयाच्या समर्थनार्थ भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा वर्धा जिल्हाच्या वतीने १६ रोजी सायंकाळी महिला पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेत पहिल्यांदाच शेकडो महिला उत्स्फुर्तपणे सहभागी झाल्या होत्या. स्थानिक झाशी राणी पुतळ्यापासून रॅलीला सुरुवात झाली. पदयात्रेत महिला शतीच्या एकजुटीचा, आत्मविश्वास दिसुन आला. सशत महिला, सशत भारतच्या घोषणेत या रॅलीत समाजातील सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध क्षेत्रातील मान्यवर महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने या पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या.

## महत्त्वाचे

### समाधान शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा मेडशी महसूल मंडळातील नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी : मालेगाव :**



तालुक्यातील मेडशी येथे महसूल विभागाच्या वतीने शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान अंतर्गत विशेष समाधान शिबिराचे आयोजन शनिवार, दि. १७ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ महसूल मंडळातील गावागावातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन शिवसेना ओबीसी सेल चे मालेगाव तालुका उपप्रमुख विठ्ठल भागवत यांनी केले आहे.महसूल विभागाच्या निर्णयानुसार या विशेष समाधान शिबिरामध्ये नागरिकांच्या विविध महसूली कामांचा तात्काळ निपटारा करण्यात येणार आहे. तसेच सातबारा उताऱ्याचे वाचन, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अर्ज, विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, आदिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलर प्रमाणपत्र आदी शैक्षणिक दाखल्यांचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. याशिवाय मंजूर फेरफार प्रकरणांतील सातबारा व खाते उताऱ्यांचे वाटप करण्यात येणार असून डिजिटल सातबारा संदर्भात जनजागृतीही केली जाणार आहे. नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार असल्याने मेडशी महसूल मंडळातील गावागावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यांनी केले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**▸विदर्भ केसरी। बार्शीटाकळी (प्रतिनिधी)**

: करुणाई बहुउद्देशीय शिक्षण संस्था, बार्शीटाकळी यांच्या वतीने



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६ रोजी भीम वाटिका, पंचायत समिती समोर उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात ॲड. नीलूताई सराटे यांच्या हस्ते भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेच्या वाचनाने झाली. त्यानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक, प्रशासकीय अधिकारी, नगरपंचायत कर्मचारी, पत्रकार बंधू तसेच पोलीस प्रशासनाचा पर्यावरणपूरक पद्धतीने स्वागत व सत्कार करण्यात आला. यानंतर भीम-बुद्ध गीतांच्या माध्यमातून प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये मुख्य गायिका रंजीता जवंजाळ, कीबोर्ड वादक सुरेश गायकवाड, तबलावादक गणेश तडसे, ढोलक वादक खैर मोहम्मद यांनी सहभाग नोंदविला. तसेच अँक्टोपॅड वादक सुनील कदम आणि साऊंड सिस्टीम संयोजनाची जबाबदारी विनय ठाकूर यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रितेश गवई व सुनील जाधव यांनी केले. या कार्यक्रमातून भारतीय संविधानाच्या मूल्यांची जपणूक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा गीतांच्या माध्यमातून प्रसार करण्यात आला. बार्शीटाकळी येथे प्रथमच संगीतमय पद्धतीने आंबेडकर जयंती साजरी करण्यात आल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. हा कार्यक्रम ॲड. नीलूताई सराटे यांच्या "समतापर्व २०२६" या संकल्पनेतून करुणाई बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. नागरिकांनी संगीतमय भीमजन्म सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमासाठी सुनील शिरसाट, तहसील विभाग, नगर पंचायत, पोलीस प्रशासन तसेच पत्रकार बंधूंनी सहकार्य केले.

### वणीत मटका अड्ड्यावर पोलिसांची धाड

**▸विदर्भ केसरी। वणी -**

वणी शहराच्या मुख्य बाजारपेठेत असलेल्या भाजी मंडीच्या गल्लीमध्ये सुरू असलेल्या वरली मटक्याच्या जुगार अड्ड्यावर वणी पोलिसांनी गुरुवारी सायंकाळी मोठी कारवाई केली. या छाप्यात रोख रकमेसह मटक्याचे साहित्य जप्त करण्यात आले असून, तीन जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या (BNS) विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. १६) सायंकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास भाजी मंडीच्या गल्लीत लोकांच्या गर्दीत बसून काही जण पैशांची देवाणघेवाण करून वरली मटक्याचे आकडे लिहीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस शिपाई मिथुन तुळशीराम राऊत यांनी पंचांसह या ठिकाणी धाड टाकली असता, आरोपी सार्वजनिक ठिकाणी जुगार खेळताना रंगेहाथ मिळून आले. पोलिसांनी या प्रकरणी अश्फाक खान अब्बास खान (३६, रा. मोमीनपुरा, वणी), रवि राजेश घुगरे (३२, रा. रामपुरा वार्ड, वणी), शेख मुस्ताक शेख असम (४३, रा. ढोर दवाखान्याजवळ, वणी) – अड्डा मालक यांच्यावर कारवाई केली आहे. तपासादरम्यान आरोपींच्या अंगझडतीत ३,००० रुपये रोख, १ ते १० आकडे लिहिलेल्या मटक्याच्या चिठ्ठया, कार्बनचा तुकडा आणि पेन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# 9 खत विक्री केंद्रांचे परवाने निलंबित

## नियमभंग, ई-पॉस तफावत, साठ्यातील विसंगती उघड ; 2 जणांना कडक समज



■ या सर्व प्रकारांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी या कारवाईतून सर्व खत व बियाणे विक्रेत्यांना स्पष्ट संदेश दिला की, शेतकऱ्यांच्या हिताशी तडजोड करणाऱ्या कोणालाही माफी नाही. भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता आढळल्यास संबंधित विक्रेत्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

■ जिल्हा कृषी विभागाने घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे संपूर्ण जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शेतकऱ्यांच्या हितासाठी शून्य सहनशीलता धोरण कायम ठेवले जाईल आणि नियमभंग करणाऱ्यांवर पुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार आहे.

**▸विदर्भ केसरी। परभणी,**

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व किटकनाशकांचा अखंड व पारदर्शक पुरवठा व्हावा यासाठी जिल्हा कृषी विभागाने राबवलेल्या विशेष तपासणी मोहिमेत मोठी कारवाई करण्यात आली. नियमांचे गंभीर उल्लंघन आढळल्याने जिल्ह्यातील तब्बल 9 खत विक्री केंद्रांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले असून, 2 परवानाधारकांना कडक शब्दांत समज देण्यात आली आहे.

परभणी येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या दालनात झालेल्या सुनावणीत संबंधित केंद्रचालकांकडून सादर करण्यात आलेली बाजू व खुलासे असमाधानकारक ठरले. तपासणी दरम्यान उघड झालेल्या अनियमिततांनी प्रशासनालाही धक्का बसला असून, संपूर्ण यंत्रणेतील शिस्तबद्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तपासणी दरम्यान अनेक केंद्रांमध्ये ई-पॉस प्रणालीतील व्यवहारांमध्ये स्पष्ट तफावत आढळून आली. कंपन्यांकडून प्राप्त झालेल्या ॲकनॉलेजमेंट वेळेत स्वीकारले न गेल्याचेही समोर आले. याशिवाय, नोंदवलेला साठा आणि प्रत्यक्ष उपलब्ध साठा यामध्ये मोठी विसंगती दिसून आली. काही ठिकाणी आकडेवारीत गंभीर फरक आढळल्याने संभाव्य गैरव्यवहाराची शक्यता अधिक गडद झाली आहे. विक्री केंद्रांवर आवश्यक असलेले भावफलक व साठाफलक अद्ययावत नसणे, ही आणखी एक गंभीर बाब उघडकीस आली. तसेच शेतकऱ्यांना खरेदीनंतर पक्की बिले न देणे, बिलांवर स्वाक्षरी न घेणे यांसारख्या नियमभंगाच्या घटना सातत्याने आढळल्या.

## कवठा,डोंगरगाव परिसरात हत्तींचा धुमाकूळ सुरूच





**▸विदर्भ केसरी। अर्जुनी मोरगाव,**

रानटी हत्तींनी तालुक्यातील वडेगाव/बंध्या परिसरात शेकडो एकर शेती उध्वस्त केल्यानंतर आता आपला मोर्चा गोठणगाव, प्रतापगड, कालीमाती परीसरातील गावांकडे वळविला असून या परिसरातील मका पिकासह शेतातील सोलर पॅनलचीही नासधूस केल्याची घटना पुढे आली आहे.

३० ते ३५ च्या संख्येत असलेल्या हत्तीच्या कळपाचे दोन गटात विभाजन होत एक गट एमटीडीसी नवेगावबांध परीसरात तर दुसऱ्या गटाने कवठा, डोंगरगाव, बोळदे परीसरात बस्तान मांडले आहे. दरम्यान, या कळपाने १५ एप्रिल रोजी बोळदे येथील सिताराम कवळु मेंढे यांचे शेतातील मका पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. याच रात्री मंगलमुर्ती रामटेके यांचे शेतातील सोलर पॅनलची पुर्नतः नासधुस केली आहे. हत्तीच्या कळपाने शेतीतील पिकांसह सिंचनाच्या सामुग्रीचेही मोठ्या प्रमाणात नासधुस केल्याने नुकसानग्रस्त शेतकरी रडकुंडीस आले आहेत. तर आणखी किती दिवस या हत्तीच्या कळपाचा मुक्काम अर्जुनी-मोर तालुक्यात राहतो. हे येणारे काळच सांगणार आहे. दरम्यान, हत्तीमुक्त तालुका करा अशी मागणी परीसरातील शेतकरी करीत असले तरी वनविभाग मात्र, नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यातच मगशुल असल्याचे दिसून येत आहे.

# दीड कोटींच्या कापूस गाठींची परस्पर विक्री

## जिनिंग संचालकांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

**▸विदर्भ केसरी। राळेगाव,**



महालक्ष्मी जिनिंगमध्ये ठेवलेल्या कापूस गाठींची परस्पर विक ी करून तब्बल १ कोटी ५० लाख रुपयांनी फसवणूक केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी राळेगाव पोलिसांनी जिनिंगच्या दोन संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, संपूर्ण तालुक्यात या मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची चर्चा सुरू झाली आहे.

राळेगावचे विलास मुके (वय ५६) यांनी महालक्ष्मी संचालकांसोबत करार केला होता. या करारानुसार, त्यांच्या एकूण १९९७ कापूस गाठी या जिनिंगमध्ये साठवून ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, २१ जानेवारी २०२६ रोजी महालक्ष्मी जिनिंगचे संचालक उर्मिला नंदकुमार गांधी (वय ६१) आणि नंदकुमार गांधी (वय ६४) यांनी मुके यांची कोणतीही परवानगी न घेता आणि त्यांना अंधारात ठेवून या गाठींची परस्पर लावण्यास सुरुवात केली. विलास मुके यांच्या तक ारीवरून उर्मिला व नंदकुमार गांधी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४) व इतर संबंधित कलमांन्वये पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

जिनिंगमध्ये ठेवलेल्या एकूण १९९७ गाठींपैकी अंदाजे १२०० गाठी आरोपींनी संगनमत करून विकून टाकल्या. बाजारभावाप्रमाणे १२,५०० रुपये प्रती या दराने या १२०० गाठींची एकूण किंमत १.५० कोटी रुपये होते.

# व्हिडिओ क्लिपिंगच्या मोबदल्यात आठ लाख उकळले

**▸विदर्भ केसरी। नागपूर,**



एका स्पा सेंटरच्या मालकाला त्याच्याच व्यवस्थापक व कर्मचाऱ्याने व्हिडिओ क्लिपिंग व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल करत आठ लाख रुपये उकळले.

सदर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. रेहानुद्दीन उर्फ शहाबुद्दीन (26, लक्ष्मीनगर) असे तक्रारदाराचे नाव आहे. तो रॉयल ऑसेस, ऑरेंज स्पा, रॉयल मिन्ट व ॲम्बियन्स स्पा चालवितो. त्याच्या गावाजवळील अतिकुर उर्फ आलीकर रहमान उर्फ सुलतान अली (31, काहीकुशी, कामरू मेट्रो, आसाम) हा व्यवस्थापक व आशिक खान (26, काहीकुशी, आसाम) हा कर्मचारी म्हणून काम करत होता. कर्मचारी असल्याने, त्यांच्याकडे रेहानुद्दीनबद्दल विस्तृत माहिती होती.

आमच्याकडे तुझ्याबद्दल बरीच माहिती आहे. तसेच ऑडिओ आणि व्हिडिओ क्लिप्ससुद्धा आहेत, आम्हाला पैसे दे नाहीतर आम्ही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करु' अशी धमकी दिली. त्याबदल्यात आठ लाखांची मागणी केली. पैसे न दिल्यास ते व्हिडिओ मालकाची होणारी पत्नी आणि कुटुंबीयांना पाठवण्याची धमकी त्यांनी दिली. 14 एप्रिल रोजी त्याने सदरमधील अचरज टॉवरजवळ अतिकुर आणि आशिक यांना 8 लाख रुपये दिले. त्याने त्यांना कथित व्हिडिओ आणि ऑडिओ क्लिप डिलिट करण्यास सांगितले. मात्र, ते दोघेही टाळाटाळ करू लागले. अतिकुरने पुन्हा 2 लाख रुपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास व्हिडिओ आणि ऑडिओ क्लिप व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यांनी त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. अखेर घाबरलेल्या रेहानुद्दीनने सदर पोलिस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी दोघांविरोधातही खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# दुचाकी चोरणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना बेड्या

**▸विदर्भ केसरी। गोंदिया,**

गोंदिया जिल्ह्यासह नागपूर शहरातून दुचाकी चोरणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने गुरुवार १६ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास सापळा कारवाई करून अटक केली.

या चोरट्यांच्या ताब्यातून २ लाख १० हजार रुपये किमतीच्या चोरी केलेल्या ३ दुचाक्या जप्त करण्यात आल्या आहे. धीरज भूषण फुंडे (३५) रा. कालीमाटी, तेजराम उर्फ तेजस जगदीश आडे (३०) रा. कोंढा कोसारा, ता. पवनी जि. भंडारा असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे. मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखाचे पोलिस निरीक्षक पुरुषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनात पथकाकडून जिल्हा हद्दीत दुचाकी चोरट्यांचा शोध व गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग सुरु असताना आरोपी धीरज फुंडे व त्याचा मित्र आरोपी तेजराम उर्फ तेजस या दोघांनी गोंदिया जिल्ह्यासह नागपूर येथून दुचाकी चोरी करून सदर दुचाकीची विक्री करण्यासाठी गोंदिया येथे येणार असल्याची गुप्त माहिती मिळाली. या आधारे स्थानिक गुन्हे शाखा पथकाने गुरुवारी सायंकाळी कुडवा परिसरात सापळा कारवाई केली. ज्यामध्ये दोन्ही आरोपींना ताब्यात घेत दुचाकी चोरीच्या संबंधाने सखोल विचारपूस केली असता दोघांनी मिळून आमगाव येथून २ , गोंदिया रेल्वे स्थानक परिसरातून १ व नागपूर येथील प्रतापनगर परिसरातून १ दुचाकी चोरी केल्याचे काबुल केले. यावेळी त्यांच्या ताब्यातून चोरी केलेल्या तीन वेगवेगळ्या किमतीच्या ३ दुचाकी किमत २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदर दुचाकीबाबत गुन्हे अभिलेख तपासण्यात आले असता हे गोंदिया जिल्ह्यातील आमगाव व गोंदिया शहर पोलिस ठाणे हद्दीतील ३ गुन्हे, व नागपूर जिल्ह्यातील १ गुन्हा असे एकूण ४ गुन्हे उघडकीस आले. आरोपींनी एक दुचाकी छत्तीसगड राज्यातील कवर्धा येथे लपवून ठेवली असून ती जप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# 'त्या' दोषी आरोपींना फाशीची शिक्षा द्या!

## १८० युवतींच्या लैंगिक शोषण प्रकरणी शहरातील विविध महिला संघटनांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी!

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ -**



परतवाडा येथे उघडकीस आलेल्या धक्कादायक लैंगिक शोषण आणि ब्लॅकमेलिंग प्रकरणात सुमारे १८० हून अधिक युवतींचे शोषण झाल्याची माहिती समोर येताच संतापाची लाट उसळली आहे. मुख्य आरोपी मोहम्मद अयाज याच्यासह सहकाऱ्यांनी शेकडो अश्लील व्हिडिओ तयार करून प्रसारित केल्याच्या पार्श्वभूमीवर दोषींवर कठोरात कठोर कारवाई करून फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीचे निवेदन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांच्या मार्फत १७ एप्रिल ला पाठवण्यात आहे, यावेळी शहरातील विविध महिला संघटना मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आरोपीने युवतींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण केले व त्याचे चित्रीकरण करून ब्लॅकमेलिंग केल्याचा प्रकार अत्यंत गंभीर असून हा केवळ वैयक्तिक गुन्हा नसून संघटित गुन्हेगारीचा भाग असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणात 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा' (MCOCA) तसेच अल्पवयीन मुलींचा समावेश असल्यास 'पोक्सो' (POCSO) कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही हिंदू जनजागृती समितीने दिला आहे. निवेदन देतांना गीता परिवारच्या डॉ. निकिता चव्हाण, सौ. शुभांगी बोडखे, सौ.शकुंतला प्रजापती, योग वेदांत सेवा समितीच्या सौ. नीताताई मुंदाफळे, सौ. दीपाताई वैद्य, सनातन संस्थेच्या सौ.कल्पना राऊत, सौ. रुपाली कांबळी, दारूबंदी आणि स्त्रीशक्ती संघटनेच्या सौ. संगीताताई पवार, भाजपा वैद्यकीय आघाडीचे जिल्हा संयोजक डॉ. महेश चव्हाण, स्वयंदीप नॅचरोपॅथी सेंटरचे संचालक डॉ. दीपक घरझोडे, मंदिर महासंघाचे महादेवराव काचोरे, हिंदू जनजागृती समितीचे सर्वश्री दत्तात्रय फोकमारे, राम धारणे, धर्मप्रेमी श्रीकांत शास्त्रीकर उपस्थित होते.

# ११.९६ लाखाच्या खताची परस्पर विक्री

**▸विदर्भ केसरी। अंजनगाव सुर्जी,**



अंजनगाव सुर्जी येथील आठवडी बाजार परिसरातील शिवकृपा ॲग्रो एजन्सी या खत व कीटकनाशक विक्री केंद्राच्या गोदामामधून ६६१ पोती खत परस्पर विकून ११ लाख ९६ हजार रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी दुकानाचे मालक वसंत भगत यांच्या तक्रारीवरून गोदामकिपर अंकुश धुळे याच्याविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी वसंत मोतीराम भगत हे शिवकृपा ॲग्रो एजन्सीचे चालक आहेत. त्यांच्या गोदामामध्ये अंकुश धनंजय धुळे (३०) रा. द्वारका चौक, सुर्जी हा गेल्या दोन वर्षांपासून काम करत होता. आरोपीने मालकाला कोणतीही कल्पना न देता गोडाऊनमधील डीएपी, पोटॅशसह विविध कंपन्यांचे ६६१ पोते खत परस्पर विकले. या खतांची अंदाजे बाजार किंमत ११ लाख ९६ हजार रुपये आहे. साठा तपासणी दरम्यान ही फसवणूक मालकाच्या लक्षात आली.

फिर्यादी भगत यांनी १६ एप्रिल रोजी अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपी अंकुश धुळे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. प्राथमिक तपासात हा अपहार ३० मार्च २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत घडल्याचे समोर आले आहे. ठाणेदार सूरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करत आहेत. आरोपीने खत कोणाला विकले, रक्कम कुठे वापरली याचा शोध पोलिस घेत असून ऐन हंगाम सुरू होण्याच्या पृष्ठभूमीवर झालेल्या या प्रकारामुळे परिसरातील शेतकरी व व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# जुगाऱ्याचा डाव पोलिसांनी उधळला

**▸विदर्भ केसरी।**

शेतातील अलिशान फॉर्म हाऊसवर पोलिसांनी छापा टाकीत जुगा-यांचा रंगलेला डाव उधळला. ही कारवाई शुक्रवारी (ता.१७) स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळच्या पथकाने केली. या कारवाईत पोलिसांनी ९ लाख ८७ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एकूण १६ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

उमरखेड पोलीस ठाणे हद्दीतील राजू गव्हाणे यांच्या शेतातील फार्म हाऊसमध्ये लपून-छपून हार-जितचा पत्ता जुगार खेळला जात असल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने शुक्रवारी तातडीने छापा टाकला. पोलिसांची चाहूल लागताच काही इसम पळून जाण्यात यशस्वी झाले, मात्र १६ जणांना पोलिसांनी घटनास्थळावरूनच ताब्यात घेतले.

पकडण्यात आलेल्या १६ आरोपींमध्ये नांदेड, हदगाव, महागाव आणि उमरखेड परिसरातील व्यक्तींचा समावेश आहे. यात सूरज गुप्ता (बाळदी), नितेश राठोड (दत्तबडी), ग्यानबा चिकणे (टेंभी), टिकाराम चव्हाण (दत्तबडी), सय्यद रसूल (उमरखेड), संतोष जोगदंड (चिलगव्हाण), मनोहर जाधव (पोळी), से. सोहल अली (नांदेड), से. पाशु (नांदेड), शिवाजी कदम (नांदेड), अशोक शिंदे (मुदखेड), शेख शहबाज (नांदेड), शेख रमजान (उमरखेड), शेख बादशहा (आर्णी), नारायण चव्हाण (नांदेड) आणि शरद राठोड (ढाणकी) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून ८ लाख २ हजार ४० रुपये रोख, ६५ हजार रुपये किमतीचे १० नग मोबाईल आणि १ लाख २० हजार रुपये किमतीच्या ८ मोटार सायकली, असा एकूण ९ लाख ८७ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी उमरखेड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपींना पुढील कारवाईसाठी उमरखेड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी प्रमुख सतीश चवरे, सपोनि पवन राठोड, धीरज बांडे, पोउपनि गजानन राजमल्लू, शरद लोहकरे आणि त्यांच्या पथकाने पार पाडली.

» Selected

## येरदळमी येथे बंद सौर नळ दुरुस्त; आदिवासी नागरिकांना दिलासा-भाकपा



एटापल्ली : ग्रामपंचायत गट्टा अंतर्गत येणाऱ्या येरदळमी गावातील श्री. रामचंद्र लेकामी यांच्या घरासमोरील सौर ऊर्जेवर आधारित दुहेरी नळ अखेर दुरुस्त करण्यात आला असून, त्यामुळे गावातील आदिवासी नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी सोय झाली आहे. मागील काही महिन्यांपासून हा नळ बंद अवस्थेत असल्याने गावातील नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. विशेषतः महिलांना दूरवर जाऊन पाणी आणावे लागत होते, त्यामुळे उन्हाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनली होती. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (भाकपा) जिल्हा सहसचिव कॉ. सचिन मोतकुरवार यांच्याकडे मदत मागितली होती. नागरिकांची अडचण लक्षात घेऊन कॉ. मोतकुरवार यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत तातडीने नळ दुरुस्त करण्याची मागणी केली. त्यांच्या प्रयत्नांना यश येत संबंधित विभागाने तातडीने दखल घेत नळाची दुरुस्ती पूर्ण केली. सध्या हा सौर नळ पुन्हा सुरू झाला असून गावातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे.

---

## गडचिरोलीत 'नारी शक्ती वंदन विधेयक' समर्थनार्थ भव्य पदयात्रा

गडचिरोली :- भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'नारी शक्ती वंदन विधेयक'ाच्या समर्थनार्थ गडचिरोली शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य पदयात्रा रॅलीला महिला शक्तीचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रॅलीने संपूर्ण शहरात नारी सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश दिला. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना ३३ टक्के राजकीय आरक्षण देत त्यांच्या सन्मानाला नवी उंची दिली असून, हा निर्णय नव्या भारताच्या सशक्त आणि समताधिष्ठित निर्मितीचा पाया असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. इंदिरा गांधी चौक येथून रॅलीची उत्साहात सुरुवात झाली. ढोल-ताशांच्या गजरात, घोषणाबाजी करत 'नारी शक्तीचा सन्मान, हाच भारताचा अभिमान' अशा घोषणांनी वातावरण दणाणून गेले.

शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही पदयात्रा 'कर्तव्य कक्ष' (जनसंपर्क कार्यालय) येथे उत्साहात संपन्न झाली. या रॅलीत महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. विविध वयोगटातील महिला, युवती आणि कार्यकर्त्यांनी हातात फलक व बॅनर घेत नारी सक्षमीकरणाचा संदेश घरोघरी पोहोचवला. संपूर्ण गडचिरोली शहर 'नारी शक्ती'च्या जयघोषाने दुमदुमून गेले.

यावेळी जिल्हाध्यक्ष रमेशजी बारसागडे आमदार डॉ. मिलिंद नरोटे, नगराध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर, देसाईगंज नगराध्यक्ष लताताई सुंदरकर, माजी जि.प. अध्यक्ष योगिताताई भांडेकर, ज्येष्ठ नेते रमेशजी भुरसे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा योगिताताई पिपरे, लोकसभा समन्वयक प्रमोदजी पिपरे, महिला मोर्चा प्रदेश सचिव रेखाताई डोळस, शहराध्यक्ष अनिलजी कुनघाडकर, तालुकाध्यक्ष दत्तुजी सूत्रपवार तसेच गडचिरोली, आरमोरी, वडसा येथील नगरसेविका, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीदरम्यान नगराध्यक्षा प्रणोतीताई यांनी महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी हे विधेयक ऐतिहासिक असल्याचे सांगत महिलांनी समाज आणि राष्ट्रनिर्मितीत अधिक प्रभावी भूमिका बजावण्याचे आवाहन केले. सहभागी झालेल्या सर्व महिला व कार्यकर्त्यांचे आभार मानत आगामी काळातही अशाच एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. या भव्य पदयात्रेद्वारे 'नारी शक्ती वंदन विधेयकाला ठोस पाठिंबा देत महिला सक्षमीकरणाचा संदेश प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्यात यश आले.

# गडचिरोलीतील विकास कामांच्या सर्व फाईल्स फास्टट्रॅकवर घ्या : अग्रवाल

## वनहक्कधारक शेतकऱ्यांना तातडीने 'फार्मर आयडी' देण्याचे निर्देश

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यातील विकास कामांशी संबंधित मंत्रालय स्तरावरील सर्व प्रलंबित फाईल्स फास्टट्रॅकवर घेऊन कामांना तातडीने गती देण्याचे स्पष्ट निर्देश राज्याचे मुख्य सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले. याचबरोबर वनहक्कधारक शेतकऱ्यांना तातडीने 'फार्मर आयडी' उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी निर्देश दिले. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातून अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख



अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या महत्त्वाच्या प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये महसूल , खनिकर्म, राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम, क्रीडा व आरोग्य विभाग आदी विविध विभागांकडून प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांचा समावेश होता. संबंधित विभागांनी या प्रस्तावांच्या पाठपुराव्यात गती आणावी, असे निर्देश मुख्य सचिवांनी दिले. रिक्त पदांच्या विषयावर जिल्हा परिषद, बांधकाम, आरोग्य व इतर विभागांतील रिक्त पदे माहे मे अखेरपर्यंत जास्तीत जास्त भरण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वनजमिनीचे पट्टे मिळालेल्या शेतकऱ्यांना तातडीने 'फार्मर आयडी' देऊन विविध शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. जिल्ह्यातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग व सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सुरू असलेल्या रस्ते व पुलांच्या कामांना समन्वयातून गती देण्याचे निर्देश देण्यात आले. जलसंपदा विभागांतर्गत विविध प्रलंबित प्रकल्पांना प्राधान्याने मंजुरी देऊन प्रत्यक्ष कामांना वेग देण्यावर भर देण्यात आला. यावेळी विविध केंद्र व राज्य योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटी व 'रेड फ्लॅग' बाबींचाही आढावा घेण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) व प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतील कमी प्रगती तसेच पीएम सूर्यघर योजनेतील अत्यल्प अंमलबजावणीबाबत मुख्य सचिवांनी गांभीर्याने लक्ष वेधले. निर्माणाधीन घरे प्राधान्याने पूर्ण करण्याचे सांगतानाच प्रलंबित घरकुल हप्त्यांसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल असेही ते म्हणाले.

### निधीचा प्रभावी वापर करण्याचे निर्देश

अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी विकास कामांच्या पूर्ततेसाठी गडचिरोली जिल्ह्याच्या विशेष दौऱ्यावर असल्याचे सांगितले. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील कामांची माहिती दिली. यावेळी मुख्य सचिव कार्यालयातून विविध विभागांचे अपर मुख्य सचिव व सचिव दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते, तर जिल्हा स्तरावरील वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते.

## नवसंजीवनी वाचनालयाच्या वतीने डॉ.बाबासाहेबांना अभिवादन







विदर्भ केसरी । देसाईगंज

कुरखेडा तालुक्यातील दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय देऊळगाव येथे विश्वरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संतोष ठलाल यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करून अभिवादन केले. तसेच साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी सुद्धा बाबासाहेबांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून, बाबासाहेबांच्या जीवनावर दोन शब्द बोलून अभिवादन केले. त्या शुभ प्रसंगी वाचनालयाच्या सदस्य निर्मला ठलाल,सत्यभामा ठलाल, अनिता पटणे,छगण ठलाल, नंदिनी पटणे,संतोष ठलाल, संगीता ठलाल प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोर पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सज्ज : उल्लंघन करणाऱ्यांवर होणार कारवाई

विदर्भ केसरी । गडचिरोली

गडचिरोली: अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर दरवर्षी बालविवाहाच्या घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन गडचिरोली जिल्हा प्रशासन व महिला व बालविकास विभाग ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. या दिवशी कुठल्याही प्रकारचा बालविवाह झाल्यास संबंधितांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी दिल्या आहेत.

बालविवाह प्रतिबंधासाठी जिल्हा प्रशासनाने सविस्तर ॲक्शन प्लॅन तयार केला असून ग्रामीण भागात बालविवाह रोखण्याची जबाबदारी ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. तसेच शहरी भागात बाल विकास प्रकल्प अधिकारी (सीडीपीओ) यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या अधिकाऱ्यांकडून संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. बालविवाहात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये विवाह सोहळ्यात सेवा देणारे पंडित, धार्मिक गुरु, मंडप मालक, फोटोग्राफर, केटरिंग व्यवसायिक, लॉन्स मालक तसेच वाजंत्री यांचा समावेश असून, बालविवाहाला प्रोत्साहन देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कायद्याच्या कक्षेत आणले जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. अक्षयतृतीया हा सण साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा शुभ मुहूर्त मानला जातो. या दिवशी मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळे पार पडत असल्याने काही ठिकाणी बालविवाहाच्या घटना घडण्याची शक्यता असते. याची दखल घेत प्रशासनाने या वर्षी विशेष खबरदारी घेतली असून जिल्ह्यात एकही बालविवाह होऊ नये, यासाठी सर्व यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत. बालविवाह रोखण्यासाठी नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९८ किंवा आपत्कालीन क्रमांक ११२ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्राप्त माहिती गोपनीय ठेवण्यात येणार असून त्वरित कारवाई केली जाईल.

## देसाईगंज येथे कृषी केंद्र संचालकावर फौजदारी गुन्हा

विदर्भ केसरी । गडचिरोली

गडचिरोली, (जिमाका) दि. १७ : शेतकऱ्यांच्या हक्काचे अनुदानित डीएपी खत (DAP) अनधिकृतरीत्या जिल्ह्याबाहेर विकणे, खताचा काळाबाजार करणे तसेच शासकीय ई-पॉस (e-POS) प्रणालीमध्ये फेरफार केल्याप्रकरणी देसाईगंज येथील मे. नाकाडे कृषी केंद्र चे संचालक भास्कर महादेव नाकाडे यांच्याविरुद्ध देसाईगंज पोलीस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रिती हिरळकर यांनी दिली आहे. कृषी विभाग गडचिरोलीच्या जिल्हा भरारी पथकाने व तालुका गुणनियंत्रण निरीक्षकांनी दिनांक ८ ते १२ एप्रिल २०२६ दरम्यान संबंधित कृषी केंद्राची संयुक्त तपासणी केली. या तपासणीत गंभीर अनियमितता उघडकीस आली असून, शेतकऱ्यांच्या नावे ई-पॉस मशीनवर सुमारे १.५ मेट्रिक टन डीएपी खत विक्री दाखवण्यात आली असली तरी संबंधित शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात इतक्या प्रमाणात खत घेतले नसल्याचे स्पष्ट झाले. यावरून बोगस विक्रीचे प्रकार उघड झाले आहेत. तसेच आय.एफ.एम.एस. (iFMS) पोर्टलवरील नोंदींच्या पडताळणीत सुमारे २५ मेट्रिक टन अनुदानित खताची विक्री जिल्ह्याबाहेर करण्यात आल्याचे निदर्शनास आले. याशिवाय दुकानातील साठा नोंदवही (एन फॉर्म) अद्ययावत नसणे, प्रत्यक्ष साठा व नोंदींमध्ये मोठी तफावत आढळणे आणि शेतकऱ्यांना पक्की बिले न देणे असे गंभीर प्रकारही तपासणीत समोर आले. या प्रकरणी कृषी विभागाने दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी संबंधित संचालकास कारणे दाखवा नोटीस बजावली होती. मात्र सादर केलेला खुलासा असमाधानकारक ठरल्याने तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या खत निरीक्षक श्रीमती शितल खोबरागडे यांनी देसाईगंज पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली. त्यानुसार अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच खत (नियंत्रण) आदेश, १९८५ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, कृषी विभागाने जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांना स्पष्ट इशारा देत खत विक्रीमध्ये पारदर्शकता राखण्याचे निर्देश दिले.

# मौशिखांबच्या डॉ. मोरेश्वर उंदिरवाडे यांना मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. पदवी

## वडिलांचे लहानपणी निधन, आईची मजुरी... संघर्षातून शिक्षण घेत इंग्रजी विषयात डॉक्टरेट....

विदर्भ केसरी । मंगेश सहारे

गडचिरोली : अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि बालपणापासूनचा संघर्ष यांवर मात करत शिक्षणाच्या बळावर उंच भरारी घेणाऱ्या मौशिखांब येथील Dr. Moreshwar Undirwade यांना नुकतीच University of Mumbai कडून इंग्रजी विषयात 'पीएच.डी.' (डॉक्टरेट) पदवी प्रदान करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील अत्यंत साध्या कुटुंबातून आलेल्या विद्यार्थ्याने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मिळवलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. डॉ. उंदिरवाडे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. ते केवळ आठ वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आई निरक्षर असून कुटुंबाकडे कोणतीही शेती किंवा स्थिर उत्पन्नाचे साधन नव्हते. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह पूर्णपणे रोजंदारीच्या मजुरीवर चालत होता. घरचा संसार चालवण्यासाठी त्यांच्या आईने मिळेल ते काम करत मुलाच्या शिक्षणासाठी मोठा संघर्ष केला. अशा परिस्थितीतही डॉ. उंदिरवाडे यांनी शिक्षणाची वाट सोडली नाही. त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण गडचिरोली जिल्ह्यातील मौशिखांब येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) येथे सातवीपर्यंत पूर्ण केले. सातवीच्या बोर्ड परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली. त्या काळी ही मोठी शैक्षणिक कामगिरी मानली जात असे. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामपंचायतीकडून त्यांना ५१ रुपयांचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यानंतर त्यांनी मौशिखांब येथील शिवाजी हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. दहावीच्या परीक्षेत त्यांनी पुन्हा एकदा प्रथम क्रमांक मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्यांच्या या कामगिरीबद्दल ग्रामपंचायतीकडून १०१ रुपये, त्यांच्या वर्गशिक्षकांकडून १००१ रुपये तसेच गडचिरोली येथील समाज कल्याण विभागाकडून ५००० रुपयांचे बक्षीस देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या यशामुळे प्रेरित होऊन त्यांनी पुढील शिक्षण गडचिरोली तालुक्यातील गिलगाव येथील श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय येथे सुरू ठेवले. बारावीच्या परीक्षेतही



त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अव्वल क्रमांक पटकावला. या यशाबद्दल समाज कल्याण विभागाने त्यांना ५००० रुपयांचे बक्षीस देऊन गौरविले. यानंतर त्यांनी गडचिरोली येथील शासकीय जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) येथे 'डिप्लोमा इन एज्युकेशन' (D.Ed.) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आणि तो यशस्वीरित्या पूर्ण केला. २०१३ मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा (TET) मध्ये त्यांनी पहिल्याच सत्रात यश मिळवले. याचबरोबर त्यांनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) देखील उत्तीर्ण केली. उच्च शिक्षणाची जिद्द कायम ठेवत त्यांनी पुणे येथील Nowrosjee Wadia College येथे इंग्रजी साहित्यात पदवी (B.A.) शिक्षण पूर्ण केले. हे महाविद्यालय Savitribai Phule Pune University संलग्न आहे. त्यानंतर त्यांनी University of Mumbai च्या इंग्रजी विभागात इंग्रजी साहित्यात पदव्युत्तर शिक्षण (M.A.) पूर्ण केले आणि त्याच विभागातून पीएच.डी. संशोधनाची वाटचाल सुरू केली.२०१९ मध्ये त्यांनी इंग्रजी विषयातील 'राज्य पात्रता चाचणी' (SET) पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली. त्यानंतर २०२० मध्ये त्यांनी इंग्रजी विषयातील 'राष्ट्रीय पात्रता चाचणी' (NET) यशस्वीरित्या पूर्ण केली. NET उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना University Grants Commission तर्फे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी दिली जाणारी 'राष्ट्रीय फेलोशिप' प्रदान करण्यात आली. त्यांच्या संशोधन प्रबंधाचे शीर्षक "शशी थरूर यांच्या निवडक साहित्यकृतींमधील राजकीय विचारसरणी, साम्प्रदायिकता आणि धर्मनिरपेक्षता यांचा अभ्यास" असे आहे.

## जिवंत कासवांची तस्करी पकडल्याचा खळबळजनक प्रकार

### सहा आरोपी अटकेत, मुख्य मांत्रिक फरार ; आणखी 10 जण ताब्यात..!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

सावली :- राज्यात भोंदू अशोक खरात प्रकरणाने खळबळ उडाली असतानाच चंद्रपूर जिल्ह्यात अघोरी पूजेतून गुप्तधनाचा शोध,सोन्याची बिस्किटे मिळवणे आणि पैशाचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून कुमारी आणि विधवा महिलांचा अघोरी पूजेसाठी वापर केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सावली तालुक्यातील चिंचडोह बॅरेज परिसरात वन विभागाने जिवंत कासवांची तस्करी पकडल्यानंतर हा खळबळजनक प्रकार समोर आला. महिलांचे लैंगिक शोषण झाल्याची शक्यताही वर्तवली जात आहे. स्मशानभूमीत अघोरी पूजेचे चित्रीकरण, घुबड आणि कासवांसह अनेक तरुण मुली आणि विधवा महिलांची छायाचित्रे,त्यांच्या जन्मकुंडल्या आणि खासगी अवयवांची छायाचित्रे तसेच महिलांच्या



मासिक पाळीच्या तारखांची नोंदही आरोपींनी ठेवली होती. सावली वनपरिक्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी १२ एप्रिल ला दोन जिवंत कासवांची तस्करी करणाऱ्या गंगाधर बुरांडे, मोरेश्वर देवतळे, ओम शिंदे, हमचंद शेंडे, धवल वेलादी आणि राजेंद्र दिवसे या सहा आरोपींना अटक केली. आरोपींच्या भ्रमणध्वनीत वन्यजीव तस्करीसोबतच अघोरी पूजेच्या चित्रफिती आणि संदेश दिसून आले. या टोळीचे जाळे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात पसरलेले आहे. यात ५० पेक्षा अधिक जण सक्रिय असल्याचे कळते. ते ग्रामीण भागामध्ये शिकार शोधण्याचे काम करायचे आणि महिलांच्या जन्मकुंडल्या, त्यांच्या चित्रफिती मुख्य मांत्रिकाकडे पाठवायचे. मांत्रिकाला 'टेस्टर' म्हटले जात होते. एखादी महिला किंवा प्राणी अघोरी पूजेसाठी योग्य आहे की नाही, हे 'टेस्टर' ठरवत असे. त्यानंतर निर्जनस्थळी किंवा स्मशानभूमीत अघोरी विधी पार पाडले जात होते. पैशाचा पाऊस पाडणे आणि गुप्तधन मिळवून देण्याच्या नावाखाली श्रीमंत आणि गरीब अशा दोन्ही स्तरांतील लोकांना फसवले जात होते. आरोपींनी अघोरी पूजेतून सोन्याची बिस्किटे मिळाल्याचा बनाव रचला होता वनविभागाच्या छाप्यादरम्यान ती बिस्किटे बनावट असल्याचे उघड झाले. याप्रकरणी सहा आरोपींवर वन गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली. सर्व सहा आरोपी वनकोठडीत असून, मुख्य सूत्रधार असलेला मांत्रिक अद्याप फरार आहे. हे प्रकरण अत्यंत गंभीर आणि गुन्हेगारी स्वरूपाचे असल्याने लवकरच हा तपास पोलीस विभागाकडे वर्ग केला जाणार आहे. या प्रकरणामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, भोंदूगिरीच्या या विळख्यात आणखी किती महिला अडकल्या आहेत, याबाबत तपास सुरू असुन, वन विभागाने आणखी दहा जणांना ताब्यात घेतले आहे. अघोरी पूजेच्या या प्रकारात आणखी बरेच जण सहभागी असून त्यांचा शोध घेतला जात आहे. आरोपींच्या भ्रमणध्वनींत अघोरी पूजेच्या चित्रफिती आणि छायाचित्रे मिळाली.पूजेसाठी मुली आणि विधवा महिलांचा वापर केला जात होता, असेही तपासात समोर आले आहे,अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे यांनी दिली.

## लॉयड्स मेटल्सचे संचालक बी. प्रभाकरण यांचे वाढदिवसाच्या निमित्त साधून महारक्तदान शिबीर..!

विदर्भ केसरी । सुरजागड


सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या सीएसआर शाखा, लॉयड्स इन्फिनिटी फाउंडेशनतर्फे कोनसरी व सुरजागड येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिक व कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे तब्बल ७७७ युनिट रक्त संकलित करण्यात आले.

विशेष म्हणजे, मागील वर्षीच्या ५०१ दात्यांच्या संख्येला मागे टाकत यंदाच्या शिबिराने नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. बी. प्रभाकरन यांनी स्वतः पुढाकार घेत प्रथम रक्तदान केले. त्यांच्या या कृतीमुळे उपस्थित कर्मचाऱ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला. "रक्तदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा आहे. एका छोट्याशा कृतीतून आपण कोणाचातरी जीव वाचवू शकतो. अशा उपक्रमांमुळे समाजातील एकोपा आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होते," असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.


शिबिरात कंपनीच्या विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. अनेकांनी प्रथमच रक्तदान करून समाजसेवेच्या या उपक्रमात सहभाग घेतला.

शिबिराचे सुयोग्य नियोजन, वैद्यकीय पथकाची तत्पर सेवा आणि सुरक्षिततेची घेतलेली काळजी यामुळे संपूर्ण कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला. लॉयड्स मेटल्स ही संस्था केवळ औद्योगिक क्षेत्रापुरती मर्यादित न राहता सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेत असल्याचे या शिबिरातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

भविष्यातही समाजहिताच्या दृष्टीने विविध आरोग्य, शिक्षण व सामुदायिक विकासाच्या योजना राबविण्याचा कंपनीचा मानस असून, अशा मानवतावादी उपक्रमांतून समाजाशी असलेली बांधिलकी अधिक दृढ करण्याचा निर्धार व्यवस्थापनाने व्यक्त केला.



महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी हिंगणा यांचे कार्यालय
Email ID- tahasildarhingna@gmail.com दुरध्वनी क्र. 07104-276134
क्र. म.स./जन्म- मृत्यू /तह.हि./कावि-468/2026 दिनांक :- 15/04/2026
वाचा :- 1. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 12 मार्च 2025
2. मा. उप सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. 03/ई-1 अ.दि. 17/03/2025
3. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-1/जन्म–मृत्यु आदेश/कावि- 104/2025 दि 17/03/2025
4. श्री/ श्रीमती मैनाबाई तिलकचंद कैथे रा. रायपूर ता. हिंगणा जि. नागपूर यांचा अर्ज दिनांक 16/01/2026
-: जाहिरनामा :-
ज्याअर्थी अर्जदार श्री/श्रीमती मैनाबाई तिलकचंद कैथे रा. रायपूर ता. हिंगणा जि. नागपूर यांचे/यांची पती/पत्नी/मुलगा/मुलगी/आई/वडील/बहीन/भाऊ/आजी/आजोबा हीच्या/यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत/ नगर परिषद/ नगरपंचायत च्या दप्तरी घेणेकरीता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू कु./श्री /श्रीमती तिलकचंद दिना कैथे हिचा/यांचा मृत्यू दिनांक 12/11/1978 रोजी त्यांचे राहते घरी रायपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे.त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्यूचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामा करीता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबतत्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी हिंगणा उपरोक्त वाचा क्र. 1 आणि 2 व 3 मध्ये नमूद केल्या प्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्यू बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरीता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी हिंगणा यांचे न्यायालयात स्वत: जातीने/ वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यू बाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यू नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.
तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, हिंगणा




दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

शनिवार, दि. 18 एप्रिल 2026




# सेंद्रिय शेतीच्या ओढीने...

**सध्या लोकांना पोषक, आरोग्यदायी खायचं आहे. म्हणूनच सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या फळं आणि भाज्यांना मागणी वाढते आहे. नोकऱ्यांची कमतरता असणाऱ्या काळात सेंद्रिय शेती हा उत्पन्नाचा चांगला मार्ग बनला आहे. कर्नाटकच्या अमोघ जगतापनेही एमबीए केल्यानंतर सेंद्रिय शेती करायला सुरूवात केली. त्याच्या भरारीविषयी...**

इंजिनिअरींग, एमबीए केलेले अनेक तरुण शेतीकडे वळत आहेत. आयटी किंवा कॉर्पोरेट क्षेत्रातल्या धकाधकीपेक्षा त्यांना नैसर्गिक वातावरणात शेती करणं आवडू लागलं आहे. कर्नाटकचा अमोघ जगताप अशाच काही तरुणांपैकी एक. अमोघला लहानपणापासूनच शेतीची ओढ लागली. शहरापासून दूर, निवांत ठिकाणी त्याच्या वडिलांनी फार्महाउस विकत घेतलं होतं. २० एकर परिसरात पसरलेल्या या फार्महाउसच्या आसपास शेतीची चांगली संधी असल्याचं अमोघने हेरलं. त्याने बंगळूरूतून एमबीए केलं. यानंतर कॉर्पोरेट क्षेत्रात जायचं की शेतीकडे वळायचं याचा निर्णय त्याला घ्यायचा होता.

**अचिव्हर**

कॉर्पोरेट ऑफिसच्या कार्यालयात राबण्यापेक्षा जमीन कसायचा निर्णय त्याने घेतला आणि २०१६ मध्ये सेंद्रिय शेतीची सुरूवात केली. तो विविध धान्यं, डाळी, फळं, भाज्यांचं पीक घेतो. या माध्यमातून निसर्गाच्या जवळ जाण्याचा त्याचा प्रयत्न आहे. तो शेतीतून वर्षाला ७ ते १० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न घेतो. इतकंच नाही, तर तो पशुपालन आणि कुक्कुटपालनाचा व्यवसायही करतो.



यासाठी त्याने विविध संकल्पना लढवल्या आहेत. एकाच हंगामात जमिनीच्या एकाच तुकड्यावर दोन प्रकारची पिकं घेण्याचा प्रयोग त्याने केला. तो यशस्वी ठरला. कर्नाटकमधल्या मल्लावल्लीतल्या त्याच्या शेतात नारळाची ८०० झाडं आहेत. रक्तचंदनाची आणि साध्या चंदनाची प्रत्येकी एक हजार झाडं आहेत. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून तो पाण्याची बचत करतो.

विक्रीच्या बाबतीतही त्याने नव्या पद्धती आणल्या आहेत. मध्यस्थांना त्याने बाजूला सारलं आहे. आपली उत्पादनं थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा त्याचा प्रयत्न असतो. ग्रीन व्हॅली नावाचं दुकान त्याने सुरू केलं आहे. मालावल्ली-म्हैसूरला जोडणाऱ्या रस्त्यावर त्याचं हे दुकान आहे. भाज्या, फळं, धान्यांसोबतच मध, गायी-म्हशीचं दूध आणि इतर दुग्धजन्य उत्पादनंही तो विकतो. मुख्य रस्त्यावर शेतकऱ्यांचा बाजार भरवतो. इथे सेंद्रिय शेती करणारे इतर शेतकरीही येतात. आपल्या उत्पादनांची विक्री करण्याची संधी त्यांना मिळते. या निमित्ताने तो अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतो. इतर शेतकऱ्यांच्या उत्पदनांना योग्य भाव मिळावा असाही त्यांचा प्रयत्न असतो.




## फंडू एसएमएस

* तुझे महसूस करने का हर अहसास अजीब है, तू पास है तो पास है, जब दूर है तो भी पास है।

* हमें कहां मालूम था की इश्क होता क्या है, बस एक 'तुम' मिले और जिंदगी मोहब्बत बन गई।

* मेरे 'शब्दों' को इतने ध्यान से ना पढो दोस्तों, कुछ याद रह गया तो मुझे भूल नहीं पाओगे।

# सुपर ट्रेंडी शर्ट्स

मित्रांनो, एखादा छानसा शर्ट तुमचा लूक पटकन खुलवू शकतो. ऑफिस पार्टी असो, मीटिंग असो किंवा व्हॅलेंटाईन्स डे डेट असो शर्टचे काही ट्रेंडी पर्याय कोणत्याही ऑकेजनची शान ठरतात. टिपिकल प्लेन, स्ट्राईप्स किंवा चेक्सवाल्या शर्टपेक्षा काहीतरी वेगळं ...य करायचं असेल तर हे पर्याय खास तुमच्यासाठी आहेत.

* कलरब्लॉक्ड म्हणजे दोन रंगांचा सॉलिड शर्ट ...मच्याकडे असायला हवा. त्यातही व्हाईट आणि ... कॉम्बिनेशन खूपच भारी दिसतं. उन्हाळा असो ...वा हिवाळा, पार्टी असो डेट... हा शर्ट कोणत्याही ...संगी शोभून दिसेल. अशा शर्ट तुमच्या वॉर्डरोबमध्ये ...सायलाच हवा.
* तुम्हाला प्रिंट्स आवडत असतील तर प्रिंटेड ...ॉटन शर्ट खरेदी करता येईल. डिसेंट प्रिंट्सचे शर्टही ...ळतात. प्रिंटेड व्हाईट शर्ट खूपच खुलून दिसतो. ...सा शर्ट कोणत्याही रंगाच्या ट्राउझरवर घालता ...ईल.
* तुम्हाला जास्तच स्टायलिश दिसायचं असेल तर ...ंट आणि स्ट्राईप्सचं कॉम्बिनेशन असणारा शर्ट कॅरी ...रता येईल. ब्लॅक अँड व्हाईट किंवा व्हाईट अँड ब्लू ...सं कॉम्बिनेशन तुम्ही करू शकता.
* ट्रॉपिकल प्रिंट्स आवडत ...सतील तर असे शर्ट्स घा...ता येतील. पांढऱ्या रंगाचा ...लॉसम प्रिंट कॉटन शर्ट खरेदी करता येईल. हा शर्ट ...न्सवर खूप छान दिसेल. त्यासोबत स्नीकर्स घाला ...णि कॅज्युअल दिसा.

**फॅशन पॅशन**

* सौम्य फ्लोरल प्रिंटवाले शर्ट भाव खाऊन जातात.



...म्ही असे शर्ट घेऊ शकता. पांढऱ्या रंगावर फ्लोरल ...ंट्स शोभून दिसतात. कॅज्युअल ऑकेजनसाठी ...न्सवर हा शर्ट घाला आणि ऑफिसला जाताना ...उझर कॅरी करा.

* जिओमॅट्रिक प्रिंट्सही इन आहेत. अशा प्रिंटचा ...वळ्या रंगाचा शर्ट शोभून दिसेल. ब्रंच किंवा कॉफी ...टसाठी हा शर्ट परफेक्ट आहे.
* पार्टी वेअर प्रिंटेड शर्टही तुमच्याकडे असायला ...वा. नेव्ही ब्लू प्रिंटेड शर्ट खास दिसेल.
* एखादा चेक्सवाला शर्ट घ्यायला हरकत नाही. ...डे मोठ्या आकाराचे चेक्स शोभून दिसतील. नेव्ही ...लू चेक्स शर्ट हटके दिसेल.

# दाढीधारी बनण्यासाठी

मुलांचा चिकना चुपडा, तुळतुळीत दाढी केलेला चेहरा मुलींना आवडेनासा झाला आहे म्हणे... म्हणूनच का सध्या सगळे गब्रू जवान दाढीधारी झाले आहेत? पण मित्रांनो, हा रफ अँड टफ लूक तुम्हाला खूप छान दिसतो बरं का... गरज आहे ती दाढीच्या जपणुकीची. काही टिप्स फॉलो करा आणि बघा, तुम्हीही रितेश, ऋतिक, अजय, सिद्धार्थ, वरुण, रणवीरच्या पंक्तीत आरामात जाऊन बसाल. अगदी प्राचीन काळापासून दाढी हे पुरुषांच्या शक्तीचं प्रतीक मानलं गेलं आहे. दाट आणि मजबूत दाढी पुरुषांची पोलादी ताकद दर्शवतं. म्हणूनच दाढी राखणं हे अनेक युवकांचं स्वप्न असतं. त्यासाठी ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. पण लक्षात घ्या, दाढी वाढण्याची गती आणि मजबुती वय आणि जेनिटिकवर अवलंबून असते. * दाढी लवकर वाढावी यासाठी आहारात प्रोटीनयुक्त पदार्थांचं सेवन वाढवावं. प्रोटीन्सअभावी दाढी खुरटी राहते. * दाढी वाढवण्याच्या प्रयत्नात असाल तर पुरेशी झोप घ्या. * दिवसातून आठ ग्लास पाणी प्यायलाच हवं. यामुळेही दाढी लवकर वाढेल.

**ग्रुमिंग**



* केस गळू नयेत यासाठी तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. * वेळोवेळी चेहऱ्यावरील मृत त्वचेचा थर दूर करत राहिल्यास दाढी वाढण्यास मदत होते. त्यामुळे पुरुषांसाठी असणाऱ्या एक्सफोलिएट मास्कचा वापर करेल. नवीन केस येण्यास मदत होईल. * दाढी वाढवण्यासाठी संयम राखायला हवा. एकदा दाढी चांगली वाढली की मधल्या गॅप्स भरल्या जातात आणि हवा तसा लूक मिळतो. * एकदा दाढी वाढली की तिची निगा राखा. यासाठी चांगल्या दर्जाच्या कंडिशनरचा वापर करा. यासाठी एरंडेल तेल सर्वोत्तम समजलं जातं. तुम्ही खोबरेल तेल, ऑलिव्ह ऑईल, पेपरमिंट ऑईलने मसाज करा. यामुळेही योग्य पोषण मिळेल आणि दाढी चांगली दिसेल. * दाढी चांगली राहण्यासाठी आहारात व्हिटॅमिन बी १, बी ६, बी १२ युक्त पदार्थांचा वापर करावा. यामुळे केसांचं उत्तम पोषण होईल.

# नातं योग्य आहे का?

मी आर्थिकदृष्ट्या सक्षम २७ वर्षांची तरूणी असून पाच वर्षांनी लहान असलेल्या मुलाच्या प्रेमात पडले आहे. आम्ही शेजारी आणि बालपणीचे मित्र आहोत. आमच्या कुटुंबियांना हे नातं मान्य होणार नाही, याची मला कल्पना असली तरी या नात्याला एक संधी द्यावी, असं मला वाटतं. बहुतेक त्यालाही मी आवडते. दुसरं म्हणजे तो फक्त २२ वर्षांचा असून मास्टर्स अभ्यासक्रमाची तयारी करत आहे. या नात्याचं मर्म त्याला कळेल का? वयातल्या अंतरामुळे भविष्यात काही समस्या निर्माण होतील का? मी खूप गोंधळून गेले आहे.



उत्तर :बराच काळ एकत्र घालवल्यानंतर एखाद्याबद्दल आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे. पण हे फक्त आकर्षण आहे का प्रेम, हे जाणून घे. त्यातच त्याला तू आवडतेस किंवा नाही याबद्दल निश्चित असं काहीच सांगता येत नाही. त्यामुळे याबाबत स्पष्टपणे बोल. त्याला आत्ता नातेसंबधात अडकायचं आहे का, हे जाणून घे. अवघा २२ वर्षांचा हा मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर झालेला नाही. त्यामुळे तू एखाद्या समुपदेशकाची मदत घे. भविष्याचा विचार सध्या तरी करू नकोस. सद्यस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न कर. नात्यात समर्पण आणि विश्वासाची गरज असते. वयातल्या अंतरावर मात करून अनेकजण सुखी संसार करत आहेत. पण आधी या मुलाच्या मनातलं जाणून घे आणि मगच पुढे जा.

**मॅच मेकिंग**

# पास्त्याला द्या ट्विस्ट

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडत असेल. भरपूर चीज घातलेला, रेड किंवा व्हाईट सॉसमधला पास्ता बघितला की तोंडाला पाणी सुटतं. याच पास्त्याला आपण देसी ट्विस्ट देऊ शकतो. हा पास्ता करायची पद्धत अगदी सोपी आहे. चला तर मग, या इंडियन स्टाईल पास्ताची रेसिपी जाणून घेऊ या.

साहित्य : एक कप पास्ता, चार कप पाणी, चिरलेला कांदा, टोमॅटो, चमचाभर आलं-लसूण पेस्ट, दोन हिरव्या मिरच्या चिरून घ्या. लाल तिखट, गरम मसाला, एक चमचा मैदा, तीन चमचे दूध, ऑलिव्ह ऑईल(नेहमीचं तेलही चालेल), मीठ, चिरलेली कोथिंबिर

**झटपट रेसिपी**

कृती: भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात थोडं मीठ आणि तीन ते चार थेंब तेल घाला. पाणी उकळल्यावर त्यात पास्ता घाला. सहा ते आठ मिनिटं शिजवून घ्या. पाणी काढून पास्ता बाजूला ठेवा. कढईत दोन चमचे तेल गरम करा. कांदा आणि हिरव्या मिरच्या परतून घ्या. त्यात आलं लसूण पेस्ट घालून हलवा. यानंतर टोमॅटो घालून शिजवून घ्या. टोमॅटो मऊ शिजले की त्यात मैदा घाला. परतून घ्या. यात दूध, चवीनुसार लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला. दूध नको असेल तर त्याऐवजी पास्ता शिजवलेलं पाणी घालता येईल. आता सर्व पदार्थ एकजीव करा. मीठ आणि तिखटाचं प्रमाण थोडं जास्त ठेवा. कारण आपल्याला अजून पास्ता घालायचा आहे. या मसाल्यात पास्ता घालून नीट हलवून घ्या. पास्त्याला नीट मसाला लागला पाहिजे. गॅस बंद करा. वरून कोथिंबिर घाला. गरमागरम खा.



## स्मार्ट टिप्स

### स्मार्टफोनची मेमरी फुल झाली तर...

आपल्या स्मार्टफोनमध्ये बरंच काही साठलेलं असतं. त्यामुळे मेमरी फुल होऊन जाते. अशा वेळी काय करायचं? पाहू या.




* अनवॉन्टेड फाईल्स डिलिट करा.
* नको असलेले फोटो आणि व्हिडिओ काढून टाका. व्हॉट्स ॲपमधला ऑटो डाउनलोडचा पर्याय काढून टाका.
* नको असलेली ॲप्स डिलिट करा.
* मोबाईलमध्ये कॅचे साठून राहतात. ते काढून टाका.

## हाऊ टू

### आयफोनचा पासवर्ड विसरलाय?



आयफोनचा पासवर्ड विसरल्यानंतर आपली भंबेरी उडू शकते. हा पासवर्ड मिळवण्यासाठी ॲपलच्या सर्व्हिस सेंटरला भेट द्यावी लागते. अर्थात काही स्टेप्स फॉलो करून आयफोन अनलॉक करता येईल. मात्र यातला डाटा डिलिट होईल.

* सर्वात आधी मॅकबुक किंवा विंडोज पीसीमध्ये आय ट्यून्स ॲप डाउनलोड करून ते ओपन करा.
* आता आयफोन फोर्स रिस्टार्ट करायचा आहे. यासाठी व्हॉल्यूम आणि पॉवर बटण एकत्र दाबून सोडावं लागेल.
* यानंतर तुम्हाला रिस्टोअर किंवा अपडेटचा पर्याय दिसेल. यापैकी रिस्टोअर पर्याय निवडा. यानंतर आयट्यून तुमच्या फोनसाठी सॉफ्टवेअर डाउनलोड करेल. यासाठी साधारण १५ मिनिटं लागतील. यानंतर आयफोन 'रिकव्हरी मोड'मधून बाहेर पडेल.

## व्हॉट्स न्यू?

### योगासने शिका ॲपवर!

फिटनेससाठी हजारो ॲप्स उपलब्ध आहेत. त्यावरून वर्कआऊटसाठी वेगवेगळे व्यायामप्रकार शिकता येतात. आता योगासनांसाठी सुद्धा अशी ॲप्स आली आहेत. या ॲप्सवरून तज्ज्ञांच्या मदतीने योगासनं शिकता येतील. यातील काही ॲप्स विनामूल्य आहेत तर काही ॲप्सवर अत्यल्प फी भरावी लागते. सध्या ॲप्सवरून योगासनं शिकण्याचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळे अशी ॲप्स तयार होण्याचं प्रमाणही वाढत आहे. पण कोणत्याही ॲपवरून योगासनं शिकताना आधी खातरजमा करून घ्या. ॲपवरील माहिती गुगल किंवा जाणकारांकडून क्रॉसचेक करून घ्या. आपल्या वेळेनुसार योगासनं शिकता येतात हा या ॲपचा महत्त्वाचा फायदा आहे. अनेकांना व्यस्त दिनचर्येमुळे योगासनांच्या क्लासला जाता येत नाही. अशांसाठी ही ॲप्स महत्त्वपूर्ण ठरतात.



## सोशल मिडिया

### असं करा गुगल सर्च...

दोस्तांनो, माहिती कोणतीही असो, ती शोधण्यासाठी आता पुस्तक उघडण्याची गरज राहिलेली नाही. गुगलने आपल्या सगळ्या समस्या सोडवल्या आहेत पण गुगल सर्च करताना काही अडचणी येऊ शकतात. या टिप्सनी तुम्ही झटपट गुगल सर्च करू शकता. * स्पेलिंग सर्च करायचं असेल तर त्या शब्दाशी संबंधित दोन-चार अक्षरं लिहा. या अक्षरांच्या मध्ये '&' किंवा 'or' हा शब्द टाकून सर्च करा. स्पेलिंग लवकर सापडेल. * वेबसाईट सर्च करताना साईटशी संबंधित माहिती लिहा. मध्ये '~' चिन्ह टाका. साईट्स मिळतील. * एखाद्या साईटवरचा ठराविक लेख वाचायला असेल तर साईट अ‍ॅड्रेस टाकून लेखाचा विषय टाका. लेख लवकर सापडेल. * टायटल किंवा यूआरएल शोधायचं असेल तर intitle: लिहून तो शब्द लिहा. * एकाच प्रकारच्या वेबसाईट्स शोधायच्या असतील तर related: टाकून ती साईट टाका.

# अनुभवा सर्फिंगचा थरार

आपल्या भारतातही वॉटर स्पोर्ट्स बरंच लोकप्रिय होत आहे. स्कुबा डायव्हिंग, रिव्हर राफ्टींग, सर्फिंग, मोटर बोटची सफर असे बरेच पर्याय उपलब्ध आहेत. वॉटर स्पोर्टसचा थरार वेगळाच असतो. तुम्हाला सर्फिंग करावंसं वाटत असेल तर भारतातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांना भेटी देता येतील. सर्फिंगचे हे काही देसी पर्याय...

* वॉटर स्पोर्टसचा भन्नाट अनुभव घेण्यासाठी पुड्डूचेरीला भेट द्या. इथले स्वच्छ आणि सुंदर समुद्रकिनारे तुम्हाला आकर्षित करतील. इथल्या समुद्रातल्या लाटांवर स्वार होऊन मस्तपैकी सर्फिंग करता येईल. इथला सेरेनिटी समुद्रकिनरा सर्फिंगसाठी प्रसिद्ध आहे. तसंच अन्य आकर्षक समुद्रकिनारेही आहेत.

* केरळ हे भारतातल्या सुंदर राज्यांपैकी एक. केरळचा कोवलम समुद्रकिनारा खूप प्रसिद्ध आहे. इथेही सागराच्या उंच उंच लाटांवर स्वार होऊन सर्फिंगचा आनंद लुटता येईल. * कर्नाटकमधल्या गोकर्णचा समुद्रकिनारा खास आहे. हा समुद्रकिनारा पर्यटकांचं खास आकर्षण ठरतो. हा समुद्रकिनाराही सर्फिंगसाठी उत्तम मानला जातो. इथे बरेच पर्यटक सर्फिंगसाठी येतात. इथल्या महाबळेश्वर मंदिराला भेट दिल्यानंतर लोक गोकर्णच्या समुद्रकिनाऱ्यावर येऊन सर्फिंगचा थरार अनुभवतात. तुम्हीही अशी एखादी सहल ठरवू शकता.

**भटकंती**

* गोवा हे पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. देशाविदेशातले पर्यटक गोव्याला भेट देत असतात. इथले शांत आणि सुंदर समुद्रकिनारे पर्यटकांचं मन मोहवून टाकतात. इथला निसर्ग प्रेमात पाडतो. गोव्यातही सर्फिंगची संधी मिळते. इथे बरेच सर्फिंग पॉईंट्स आहेत. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत सर्फिंग करता येईल.

यंदा पर्यटनाच्या काही वेगळ्या वाटा निवडून आनंद द्विगुणित करता येईल.



# इंजिनिअरिंग इन रबर टेक्नॉलॉजी

दोस्तांनो, इंजिनिअरींग म्हटलं की ठराविक शाखांचा विचार मनात येतो. सॉफ्टवेअर, कॉम्प्युटर, सिव्हिल, ऑटोमोबाईल या इंजिनिअरींगच्या कॉमन शाखा आहेत. सहसा कुणी या पर्यायांपलीकडे बघत नाही. पण इंजिनिअरींगचं क्षेत्र प्रचंड मोठं आहे. सरधोपट शाखा निवडायच्या नसतील तर रबर टेक्नॉलॉजीचा पर्याय तुमच्याकडे आहे.

* रबराचा वापर प्रत्येक क्षेत्रात केला जातो. रबर टेक्नॉलॉजी ही इंजिनिअरींगची शाखा असेल असा विचार आपल्या मनात सहसा डोकावत नाही. पण या क्षेत्रात तुम्ही उत्तम भविष्य घडवू शकता.

**वेगळ्या वाटा**

* रबर टेक्नॉलॉजीत रबराच्या विविध वस्तू घडवल्या जातात. नैसर्गिक रबरापासून लेटेक्स आणि सिंथेटिक रबरवर प्रक्रिया केली जाते. या रबरांपासून वेगवेगळी उत्पादनं बनवली जातात.
* बारावीत फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित हे विषय घेऊन रबर टेक्नॉलॉजी निवडता येईल. रबर टेक्नॉलॉजीशी संबंधित अनेक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बीई, बीटेक, डिप्लोमा यापैकी कोणताही पर्याय तुम्हाला निवडता येईल.



* हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर टेस्टिंग टेक्नॉलॉजिस्ट, टेक्निशियन, प्रोडक्शन इंजिनिअर, पॉलिमर स्पेशलिस्ट, मटेरियल टेक्नॉलॉजिस्ट अशा विविध पदांवर काम करता येईल.
* रबर क्षेत्रासोबतच ऑटोमोबाईल क्षेत्रातही तुम्ही काम करू शकता. सरकारी क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत.
* गुजरात टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, गांधीनगर, इंडियन रबर इन्स्टीट्यूट कोलकाता, हिंदुस्तान कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, चेन्नई, आयआयटी खरगपूर या ठिकाणी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.